रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३२५
www.ramprahar.com

बुधवार, १२ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

उरण पिरकोनमध्ये मुलासह महिलेचा बुडून मृत्यू/३
पनवेल महापालिकेकडून विविध कामांचा आढावा/६
द. आफ्रिकेची बांगलादेशवर संघर्षपूर्ण मात/८

## आषाढी यात्रेसाठी पाच हजार विशेष एसटी बस सोडणार



**मुंबई** : आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरातून लाखो भाविक पंढरपूर येथे जातात. अनेक प्रवासी स्वत:ची खासगी वाहने, रेल्वे, एसटी अथवा दिंडीसोबत चालत पंढरपूर गाठतात. यंदा भाविकांना थेट आपल्या गावातून पंढरपूरपर्यंत बससेवा उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी ४०पेक्षा जास्त भाविकांची संख्या असल्यास त्यांनी जवळच्या आगारात संपर्क साधावा, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे. या प्रवासात ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांना ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यांसारख्या सर्व सवलती लागू असणार आहेत. मागील वर्षी एसटीने आषाढीनिमित्त ४,२४५ विशेष बसगाड्या सोडल्या होत्या. त्यातून १८ लाख ३० हजार ९३४ भाविकांची सुखरूप ने-आण एसटीने केली होती. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# विधान परिषद निवडणुकीवरून 'मविआ'त वाद

### कोकण, नाशिकचे उमेदवार मागे घेण्याची काँग्रेसकडून मागणी

### उद्धव ठाकरेंनी चर्चा न करताच उमेदवार जाहीर केल्याचा आरोप





**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीमध्ये पुन्हा एकदा नाराजीनाट्य पहायला मिळत आहे. ठाकरे गटाने लोकसभेप्रमाणेच विधान परिषदेच्या चारही जागा परस्पर घोषित केल्याने काँग्रेसमध्ये प्रचंड नाराजी आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधान परिषदेचे उमेदवार मागे घ्या, असा निरोप उद्धव ठाकरे यांना दिला आहे, मात्र ते प्रतिसाद देत नसल्याचे चित्र आहे.

महाविकास आघाडी असताना घोषणा करण्याच्या आधी चर्चा केली पाहिजे होती अशी काँग्रेसची भूमिका आहे. मुंबईतून विधान परिषदेसाठी अर्ज भरलेले उबाठाचे उमेदवार ठाकरेंनी कायम ठेवावेत, मात्र कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक उमेदवार ठाकरेंनी मागे घ्यावेत, असा निरोप नाना पटोलेंनी उद्धव ठाकरेंना दिला आहे. चारही ठिकाणी चर्चा न करता उमेदवार दिल्याने काँग्रेसमध्ये नाराजी आहे. उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेमुळे काँग्रेसचे प्रभारी रमेश चन्नीथला व अन्य नेते संतापले आहेत.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, ते लंडनमध्ये गेले त्या वेळीदेखील फोन केला. त्याचवेळी मी त्यांना म्हणालो, दोन जागा तुम्ही लढा, दोन जागा आम्ही लढतो. तेव्हा ते म्हणाले तुमचे उमेदवार कोण आहेत? मग मी उमेदवारांची नावे सांगितली. मूळ प्रश्न आहे की, चर्चा करून जागावाटप केले असते तर या चारही जागा निवडून येणे सोपे झाले असते. मी सकाळपासून त्यांना फोन लावण्याचा प्रयत्न करीत आहे, मात्र त्यांचे ऑपरेटर आमच्या ऑपरेटरला साहेब तयार होत आहेत असाच निरोप देत आहे. माझ्याशी काय उद्धव ठाकरेंचा संपर्क झाला नाही. त्यामुळे नेमके त्यांच्या मनात काय आहे हेच कळत नाही.

आम्ही मुंबईत उमेदवार दिले नाही. परस्पर त्यांनी त्यांचे उमेदवार जाहीर केले. महाविकास आघाडी म्हणून ही निवडणूक लढवावी अशी काँग्रेसची भूमिका आहे, असे स्पष्ट करून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, कोकण पदवीधर आणि नाशिकच्या जागेसाठी काँग्रेस आग्रही आहे, मात्र लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाप्रमाणे उद्धव ठाकरे यांनी परस्पर उमेदवार घोषित केल्याने काँग्रेस नेत्यांमध्ये तीव्र संताप आहे. मुंबईची जागा काँग्रेस शिवसेना उद्धव ठाकरे गटाला सोडण्यास तयार आहे, मात्र कोकण आणि नाशिकसाठी आम्ही आग्रही आहोत.

विधान परिषद निवडणुकीसाठी २६ जूनला मतदान आणि १ जुलैला मतमोजणी करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत १२ जून आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत आता काय घडामोडी होतात याकडे लक्ष असेल.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून पाण्यासह कृषी क्षेत्राचा आढावा



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पावसाला सुरुवात झाली आहे. यंदा चांगला पाऊस होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून राज्यात १ ते ११ जूनपर्यंत संपूर्ण जून महिन्याच्या सरासरीच्या ३६ टक्के पाऊस झाला आहे. त्या दृष्टीने कृषी विभागाने खरीप हंगामाचे नियोजन करावे. शेतकऱ्यांना बियाणे, खतांची टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घ्यावी. ज्या भागात पाणीटंचाईची स्थिती आहे तेथे टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि चारा छावण्यांसाठी जिल्हा प्रशासनाने प्राधान्य द्यावे. आपत्ती काळात सर्व विभागांनी समन्वयातून काम करून नागरिकांना वेळेवर मदत पोहचेल या दृष्टीने कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि. ११) येथे दिले.

टंचाईच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी वीजपुरवठा उपलब्ध होत नसेल तर त्या ठिकाणी जिल्हा विकास निधीतून सोलर पंप बसविण्यासाठी व पाणी साठवणुकीसाठी प्लास्टिक टाक्या घेण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यातील पाण्याच्या उपलब्धतेबाबत सद्यस्थिती व पर्जन्यमानाबाबतची आढावा बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अनिल पाटील, संजय बनसोडे, शंभूराज देसाई, धनंजय मुंडे, दादा भुसे, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर आदी उपस्थित होते.

यंदा चांगला पाऊस पडणार, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी बळीराजाला खरीप हंगामासाठी शुभेच्छा दिल्या. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी यंत्रणेने सज्ज रहावे, असे त्यांनी सूचित केले.

राज्यात सरासरीच्या ३६ टक्के पाऊस झाला असून जेथे पुरेसा पाऊस आहे तेथे पेरणीसाठी शेतकऱ्यांना आवाहन करण्यात यावे. खरीपासाठी बियाणे, खतांची टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घ्यावी. बियाणांचा काळाबाजार आणि बोगस बियाणे विक्री रोखण्यासाठी कृषी विभागाने धडक कारवाई करावी. त्यासाठी भरारी पथकांची संख्या वाढवावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

ज्या भागात पाणीटंचाई जाणवते तेथे टँकर भरण्यासाठी सोलर पंप वापरण्याची परवानगी देतानाच हे पाणी विहिरीत न साठवता त्यासाठी प्लास्टिक टाक्या वापराव्यात, जेणेकरून पिण्याचे स्वच्छ पाणी मिळेल. या टाक्यांना नळ बसविण्यात यावे, जेणेकरून महिलांना पाणी भरण्यासाठी सुलभता येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. वीज बिल थकीत असलेल्या पाणी योजनांचा वीजपुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घ्यावी. अशा योजनांचा वीजपुरवठा खंडित करू नये, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

### फिल्डवर जाऊन कामांना गती देण्याचे निर्देश

मदतीचा निधी जिल्ह्यांना वितरीत करण्यात आला आहे. त्याच्या वितरणाच्या प्रक्रियेला गती द्यावी. केवायसीअभावी निधी बँकेत पडून राहता कामा नये, असे सांगतानाच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेती, घरांचे पंचनामे तातडीने करण्यात यावे. जेथे पुरेसा पाऊस झाला नाही तेथे टँकर, चारा डेपो सुरू ठेवावे. जिल्हा आणि तालुका प्रशासनाने फिल्डवर जाऊन कामांना गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले.

## महाडमध्ये चार कामगारांना टेम्पोने उडवले

# दोन जणांचा मृत्यू, अन्य दोघे गंभीर जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्रातील प्रिव्ही कंपनीमध्ये रात्रपाळीसाठी पायी चालत जात असलेल्या चार कामगारांना टेम्पोने सोमवारी (दि. १०) रात्री ११च्या सुमारास जोरदार धडक दिली. यामध्ये दोन कामगारांचा जागीच मृत्यू, तर अन्य दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातप्रकरणी टेम्पोचालकाला अटक करण्यात आली आहे

प्रिव्ही कंपनीत रात्रपाळीसाठी सोलम कोंड येथून पायी निघालेल्या चार कामगारांना कोपरान फाटा येथे भरधाव वेगात जाणाऱ्या आयशर टेम्पोने (एमएच ४८-बीएम २६२३) पाठीमागून धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की चारपैकी रवींद्र धोंडिबा ढेबे (वय १९) आणि सचिन शिवाजी ढेबे (वय १८) हे दोन कामगार जागीच मृत्युमुखी पडले, तर संतोष ढेबे (वय २७) आणि निलेश ढेबे (वय १८) असे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर टेम्पोचालक चंदन रामकुमार बिन (वय २३, रा. जौनपूर, उत्तर प्रदेश) याला महाड औद्योगिक वसाहतीच्या पोलिसांनी अटक केली आहे.

## रत्नागिरीत दरड कोसळली; अनेक गावांचा संपर्क तुटला

**खेड** : रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात अस्तान-धनगरवाडी येथे मध्यरात्री भूस्खलन होऊन दरड कोसळली. मुख्य रस्त्यावर दरड कोसळल्याने बांदरी पट्ट्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

दोन दिवसांपासून पडणाऱ्या पावसामुळे ही दरड कोसळली. तीन वर्षांपूर्वी याच परिसरात घरांवर दरड कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला होता. अस्तानसोबतच वडगाव, बिरमनी ही गावे दरडग्रस्त असल्याने भूस्खलनामुळे परिसरात घबराट पसरली आहे.

## निवडक

### चंद्राबाबू नायडू आज घेणार मुख्यमंत्रिपदाची शपथ

**विजयवाडा :** आंध्र प्रदेशमध्ये चंद्राबाबू नायडू यांचे नवे सरकार स्थापन होणार आहे. ते बुधवारी (दि. १२) मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. या संदर्भात चंद्राबाबू नायडू यांनी विजयवाडा येथील ए कन्व्हेन्शन सेंटरमध्ये एनडीएच्या सर्व १६४ आमदारांसोबत बैठक घेतली. चंद्राबाबूंच्या मंत्रिमंडळात एकूण २५ मंत्री असतील. यामध्ये टीडीपीचे १९, जनसेनेचे चार आणि भाजपच्या दोन मंत्र्यांचा समावेश असणार आहे.

### प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेता दर्शनला हत्येप्रकरणी अटक

**बंगळुरू** : एका हत्येच्या प्रकरणात कन्नड सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता दर्शन थुगुदीपा याला अटक करण्यात आली. ९ जून रोजी कामाक्षीपाल्या पोलिसांनी अभिनेता दर्शनविरोधात एफआयआर नोंदवला. त्यानंतर हत्या प्रकरणात त्याला म्हैसूर येथील त्याच्या फार्महाऊसमधून अटक करण्यात आली. दर्शनला बंगळुरूमध्ये आणण्यात आले आहे. रेणुकास्वामी नावाच्या एका व्यक्तीच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

# नागोठण्यात भीषण आग; हॉटेल, दोन दुकाने जळून खाक



**नागोठणे : बातमीदार**

### लाखोंचे नुकसान

नागोठणे बसस्थानकाच्या बाजूला असलेल्या कल्पतरू हॉटेलला मंगळवारी (दि. ११) मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत हॉटेलसह बाजूला असलेली दोन दुकाने जळून खाक झाली. या आगीत लाखोंचे नुकसान झाले आहे.

आगीने अचानक रौद्ररूप धारण केल्याने हॉटेलच्या बाजूला असलेले कपड्याचे व चप्पलचे दुकान जळून खाक झाले. या आगीत हॉटेलसह दोन्ही दुकाने खाक झाल्याने तिघांचेही मोठे नुकसान झाले आहे.

आगीचे वृत्त समजताच पोलीस व अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या नऊ गाड्या आग विझवण्याचा प्रयत्न करीत होते. अखेरीस पहाटे आग विझवण्यात यश आले. परिसरातील लोकांनी आग विझवण्यासाठी मदत केली.

# महाविद्यालयीन शिक्षकेतर संघाचा आमदार निरंजन डावखरे यांना पाठिंबा



**ठाणे : प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीत भाजपचे उमेदवार निरंजन डावखरे यांना विविध संघटनांचा वाढता पाठिंबा मिळत असून अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघानेही आमदार डावखरे यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला. संघाचे अध्यक्ष डॉ.आर.बी. सिंह, सरचिटणीस माधव राऊळ यांनी आमदार डावखरे यांचा मोठ्या मताधिक्याने विजय होईल, असा विश्वासही व्यक्त केला.

कोकणातील महाविद्यालयांमधील हजारो कर्मचारी अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाचे सदस्य आहेत. कोकणातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पदवीधरांचे प्रश्न सोडविण्यासाठी आमदार डावखरे यांनी सातत्याने पुढाकार घेतला. अशासकीय शिक्षकेतरांचे प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रालयात बैठका आयोजित करण्यासाठी प्रयत्न करून, अनेक प्रश्नांवर तोडगाही काढला. त्याचे कोणतेही श्रेय न घेता प्रामाणिकपणे शिक्षकेतर संघाला मदत केली. त्यामुळे संघाने सलग दुसऱ्या निवडणुकीत आमदार निरंजन डावखरे यांना पाठिंबा दिला, असे संघाचे अध्यक्ष डॉ.आर.बी. सिंह यांनी सांगितले. कोकणातील पदवीधर मतदारांपर्यंत शिक्षकेतर कर्मचारी पोचून डावखरेंचा मोठ्या मताधिक्याने विजय घडवून आणतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, यापूर्वी कोकणातील शिक्षकांची अग्रगण्य संघटना दिवंगत माजी आमदार स्व. रामनाथ मोते यांच्या विचाराने कार्य करणारी महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटना, आमदार किसन कथोरे यांचा महाराष्ट्र राज्य स्वाभिमान प्राथमिक शिक्षक संघाने आमदार डावखरे यांना पाठिंबा दिला आहे. त्यांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून पदवीधर मतदारांबरोबर संपर्क साधला जात आहे.

यापूर्वी महाराष्ट्र राज्य स्वाभिमान प्राथमिक शिक्षक संघाने भाजपाचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. गेल्या निवडणुकीप्रमाणेच स्वाभिमान शिक्षक संघाने या निवडणुकीतही डावखरे यांना पाठिंबा दिला. कोकणात डिजिटल शाळा, शैक्षणिक गुणवत्तेत वाढ, शिक्षकांचे प्रश्न, पेन्शन योजना मंजुरी आदींबाबत आमदार डावखरे यांच्याकडून केला जाणारा पाठपुरावा स्तुत्य आहे, अशा शब्दांत आमदार किसन कथोरे यांनी त्यांचे कौतुक केले तसेच आमदार डावखरेंना बहुमताने विजय मिळेल, असा विश्वासही व्यक्त केला होता.

महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेच्या कोकण विभाग कार्यकारिणीच्या झालेल्या बैठकीतदेखील आमदार व संघटनेचे सल्लागार निरंजन डावखरे यांना पाठिंबा देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे त्यांना वाढता पाठिंबा आहे.





# राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत कर्जतच्या अमृता भगतला 'सुवर्ण'

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील शेलू येथील पॉवरलिफ्टिंगपटू अमृता ज्ञानेश्वर भगत हिने राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली आहे. राजस्थानमधील श्री गंगानगर येथे ही स्पर्धा खेळवली गेली.

पॉवरलिफ्टिंगपटू अमृता भगतने राष्ट्रीय स्पर्धेत सब ज्युनिअर गटात सहभाग घेतला होता. महाराष्ट्र राज्याच्या संघातून खेळणाऱ्या अमृताला रायगड पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनने पाठबळ दिले. तिने सुवर्णपदक जिंकले. अमृताला प्रशिक्षक विक्रांत गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

# शेलू येथील उल्हास नदीत बुडून मुलाचा मृत्यू

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील शेलू येथील उल्हास नदीमध्ये बुडून अनाथाश्रमात राहणाऱ्या ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. या मुलाच्या मृत्यूप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेरळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शेलू येथे ईरा ब्लेसिंग ट्रस्टची नंदादीप फाउंडेशन ही संस्था अनाथ, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, एकल पालकांच्या मुलांकरिता आधारगृह चालवत आहे. येथील संस्थाचालकांनी ८ जून रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास काही मुलांना उल्हास नदीवर नेले होते. या वेळी चार मुले नदीत पोहत असताना दीपक गोपाळ सिंग याला पाण्याचा अंदाज न आल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. मृत दीपक हा मूळचा मुंबईतील गोवंडी येथील राहणारा असल्याचे सांगण्यात येत आहे.

मृत मुलाच्या कुटुंबाने संस्थाचालक व अनाथाश्रमातील कर्मचाऱ्यांविरोधात नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार मालकांची कोणतीही परवानगी न घेता, संस्थेतील मुलांना सेफ्टी जॅकेट न देता व नदीच्या ठिकाणी पोहणारा तज्ज्ञ माणूस न ठेवण्याचा हलगर्जीपणा केल्याप्रकरणी केतन सोनी, शीतल पाटील, नितीन आणि प्रियांका या चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मोहन माझी होणार ओडिशाचे नवे सीएम; आज शपथविधी

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपासून भाजप हा ओडिशामध्ये मुख्यमंत्रिपद कोणाला देणार या चर्चा सुरू होत्या. दरम्यान, आता या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. भाजपचे मोहन माझी राज्याचे नवे मुख्यमंत्री असतील. ते बुधवारी (दि. १२) मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. त्यांची मंगळवारी भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली आहे.

चार वेळा आमदार राहिलेले मोहन माझी हे आदिवासी समाजातून आले आहेत. मुख्यमंत्र्यांसह सहा वेळा आमदार राहिलेले ज्येष्ठ नेते के.व्ही. सिंहदेव आणि पक्षाच्या महिला नेत्या प्रवती परिदा उपमुख्यमंत्री असतील. निमापाड्यातून परीदा पहिल्यांदाच आमदार झाल्या आहेत.



# लालबागच्या राजाचे पाद्यपूजन

**मुंबई : प्रतिनिधी**

कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लालबागच्या राजाचा पाद्यपूजन सोहळा मंगळवारी (दि. ११) मोठ्या उत्साहात झाला. या सोहळ्याचे फोटोही समोर आले आहेत.

लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे लालबागच्या राजाचे हे ९१वे वर्ष आहे. मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब कांबळे आणि कांबळी आर्ट्सचे मूर्तीकार रत्नाकर कांबळी यांच्या हस्ते बाप्पाचे पाद्य पूजन झाले. कांबळी आर्ट्स यांच्या चित्रशाळेत हा सोहळा झाला. या वेळी खजिनदार मंगेश दळवी यांनी पावती पुस्तकांचेही पूजन केले.

गणेशोत्सवाच्या सर्व तयारीस सुरुवात झाली असून आता आतुरता बाप्पाच्या आगमनाची आहे.

# राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनीच प्रदेशाध्यक्ष जयंत पाटीलांची खदखद

## नेमका रोख कुणाकडे?



**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी काही नेत्यांकडून होत असलेल्या टीकेबाबत नाराजी व्यक्त केली. यानिमित्ताने त्यांनी आपल्या मनातील खदखद बोलून दाखवली आहे. जयंत पाटील म्हणाले की, माझ्या प्रदेशाध्यक्षपदाचे महिने याआधी अनेकांनी मोजले आहेत. आता पुढचे चार महिने मोजू नका, कारण आता निवडणूक आहे. काही तक्रार असेल तर शरद पवार यांना भेटून ती करा. त्यावर ते आमच्या दोन कानाखाली मारतील, नाहीतर त्यांना योग्य वाटेल तो निर्णय घेतील. फक्त ट्विटरवर वगैरे बोलणे बंद करा.


राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार हे गेल्या काही दिवसांपासून पक्षातील काही नेत्यांच्या भूमिकेबाबत शंका व्यक्त करीत आहेत. राज्यात महाविकास आघाडीला मिळालेला विजय हा आदरणीय पवारसाहेब, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केलेल्या मेहनतीचा आहे, पण अशा परिस्थितीत आपल्या बाजूचे काही नेते रात्रीच्या अंधारात सत्ताधाऱ्यांना भेटून काही सेटिंग तर करीत नव्हते ना? याचाही शोध घेण्याची गरज आहे. अन्यथा ऐन विधानसभा निवडणुकीत विश्वासघात होऊ नये म्हणजे झाले, असे रोहित पवार यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले होते. त्याचप्रमाणे वर्धापन दिनी झालेल्या सभेतही त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली. काही नेत्यांनी दोन दगडांवर पाय ठेवले आहेत. त्यांनी एक तर इकडे थांबावे किंवा तिकडे जावे, असे रोहित पवारांनी म्हटले, मात्र ते नक्की कोणाला उद्देशून असे म्हणाले होते हे अद्याप अस्पष्ट आहे.

दरम्यान, जयंत पाटील यांच्याकडे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी असताना पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी नुकतीच शशिकांत शिंदे आणि रोहित पवार यांच्याकडे राज्याची मुख्य जबाबदारी देण्याची मागणी केली. निष्ठावान, लढाऊ नेते शशिकांत शिंदे आणि युवा आमदार रोहित पवार यांच्याकडे आता प्रदेश पक्ष संघटनेची मुख्य जबाबदारी द्यायला हवी तसेच सर्वांना सोबत घेऊन राष्ट्रीय पातळीवरसुद्धा पक्ष संघटना वाढवली पाहिजे, अशी मागणी सोशल मीडिया पोस्टद्वारे लवांडे यांनी केली होती.

या पार्श्वभूमीवर पक्षाच्या वर्धापन दिनी झालेल्या सभेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी, नोव्हेंबरनंतर मीच प्रदेशाध्यक्ष म्हणून नमस्कार करेन, पण तोपर्यंत जाहीरपणे आणि खासगीतही चर्चा करू नका. काही सूचना असतील तर मला येऊन सांगा, असे सूचक विधान केल्याने या पक्षात आलबेल नसल्याची चर्चा आहे.

# ...म्हणून पंतप्रधान मोदींनी चार प्रमुख मंत्रालयांच्या मंत्र्यांमध्ये केला नाही बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारचा रविवारी शपथविधी झाल्यानंतर तिसऱ्या कार्यकाळातील सहकारी मंत्र्यांमध्ये सोमवारी खातेवाटप झाले. या खातेवाटपामध्ये भाजपने संरक्षण, गृह, वित्त आणि परराष्ट्र ही चार प्रमुख मंत्रालये आपल्या ताब्यात ठेवली आहेत. नरेंद्र मोदी यांनी या चारही मंत्रालयांचा कार्यभार हा दुसऱ्या कार्यकाळात ही खाती सांभाळत असलेल्या मंत्र्यांकडेच कायम ठेवला आहे.

यामध्ये राजनाथ सिंह यांच्याकडे संरक्षण, अमित शाह यांच्याकडे गृह, निर्मला सीतारमन यांच्याकडे वित्त आणि एस. जयशंकर यांच्याकडे परराष्ट्र मंत्रालयाचा पदभार कायम ठेवण्यात आला आहे. आता या चार प्रमुख मंत्रालयांचा कार्यभार त्याच नेत्यांकडे कायम ठेवण्यामागची कारणे आहेत. त्याचा सरकारलाही विशेष फायदा होणार आहे.

केंद्र सरकारमध्ये एकूण आठ प्रमुख कॅबिनेट समित्या असतात. यात संरक्षण समिती ही सर्वांत महत्त्वाची असते. त्यामध्ये गृह, संरक्षण, वित्त आणि परराष्ट्र मंत्र्यांचा समावेश असतो. या चारही मंत्रालयांमध्ये कुठलाही बदल न करता पंतप्रधान मोदी यांनी सरकारची आधीचीच धोरणे पुढे नेली जातील, असा स्पष्ट संदेश दिला आहे. सध्या आघाडी सरकार असले तरी सरकारच्या धोरणांमध्ये फारसा बदल केला जाणार नाही तसेच पहिल्या दोन कार्यकाळांप्रमाणेच झटपट निर्णय घेतले जातील, असे संकेत पंतप्रधान मोदींनी आपल्या चार विश्वासू सहकाऱ्यांकडे ही चार प्रमुख मंत्रालये सोपवून दिला आहे.

सीसीएस म्हणजेच कॅबिनेट संरक्षण समितीमधील चारही नेते हे भाजपचे असल्याने राष्ट्रीय सुरक्षेबाबत एक धोरण ठरवण्यात आणि आणीबाणीच्या स्थितीत तातडीने निर्णय घेणे सोपे होणार आहे. दरम्यान, भाजपचा बहुतांश मतदार हा राष्ट्रीय सुरक्षेबाबत कमालीचा संवेदनशील आहे. त्यामुळे या मंत्रालयांना आपल्या ताब्यात ठेवत भाजपकडून एक सकारात्मक संदेश देण्यात आला आहे.

# वीज पडलेल्या जागेतून येऊ लागले निळे पाणी

**तुळजापूर : प्रतिनिधी**

राज्यात मान्सूनला सुरुवात झाली आहे. मराठवाड्यातही मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. सलग दोन दिवस कोसळणाऱ्या पावसामुळे नदी-नाले तुडुंब भरून वाहात आहेत. धाराशिव जिल्ह्यात पावसानंतर एक अजबच प्रकार घडला आहे. मसला शिवारात अचानक जमिनीतून निळे पाणी येऊ लागले आहे.

धाराशिव जिल्ह्याच्या तुळजापूर तालुक्यातील मसला शिवारामध्ये सोमवारी सायंकाळी रस्त्याच्या कडेला वीज पडली होती. ज्या ठिकाणी वीज पडली त्या जागेवरून जमिनीतून पाणी येऊ लागले. विशेष म्हणजे हे पाणी निळ्या रंगाचे आहे.

वीज पडल्यानंतर त्या ठिकाणावरून अचानक जमिनीतून निळे पाणी येऊ लागले असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. या प्रकारानंतर भूवैज्ञानिकांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. संबंधित पाणी जमिनीतून येत आहे की परिसरातून पाझरले आहे याचा शोध हे पथक घेत आहे.

अचानक जमिनीतून निळ्या रंगाचे पाणी येऊ लागल्याने ग्रामस्थांनी या ठिकाणी एकच गर्दी केली. नेमका हा काय प्रकार आहे व पाण्याचा रंग निळा कसा झाला यासारखे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. भूवैज्ञानिकांनी पाहणी करून निष्कर्ष काढल्यानंतरच या प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत.

# पिकांना किमान आधारभूत किंमत मिळावी –मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सरकार शेतकऱ्यांच्या हिताचेच निर्णय घेत आहे. केंद्रीय कृषि मूल्य व किंमत आयोगाच्या माध्यमातूनदेखील पिकांना चांगली किमान आधारभूत किंमत (एमएसपी) मिळून त्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.



सह्याद्री अतिथीगृहात मंगळवारी (दि.११) बैठक केंद्रीय कृषि मूल्य व किंमत आयोगाचे अध्यक्ष विजय पाल शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, गोवा, दीव आणि दमन तसेच महाराष्ट्राच्या प्रतिनिधी व शेतकऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीची सुरुवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केली.

या वेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, सोयाबीन, कांदा, कापूस या शेतमालाला चांगली आधारभूत किंमत मिळावी, तसेच शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नी देखील आपण लवकरच केंद्रीय कृषिमंत्र्यांना भेटणार आहोत. आज मिलेटचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करीत असून शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळायचे असेल तर मायक्रो मिलेटस्ना देखील किमान आधारभूत किंमत मिळाली पाहिजे. केंद्र आणि राज्याची विचारधारा एकच असून पंतप्रधान मोदींमुळे शेतकऱ्यांना चांगले दिवस येत आहेत. गेल्या १० वर्षांत याची प्रचिती आली आहे. पंतप्रधानपदी शपथ घेतल्यावर नरेंद्र मोदींनी सर्वप्रथम पीएम किसान सन्मान निधीच्या फाईलवर स्वाक्षरी केली आहे. आज राज्य सरकारनेदेखील शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक निर्णय घेतले असून नुकसान भरपाईपोटी पंधरा हजार कोटी दिले आहेत.

**पर्यावरणपूरक बांबूची लागवड**

ते पुढे म्हणाले की, मी स्वतःही शेतकऱ्याचा मुलगा असून मी वारंवार संबंधित तज्ज्ञ व्यक्तींशी यावर बोलत असतो. मी गावी गेलो की, आवर्जून झाडे लावतो. गेल्या वर्षभरापासून पर्यावरणाला पूरक अशा बांबू लागवडीला आम्ही मिशन मोडवर सुरुवात केली आहे. आमचे राज्य यामध्ये देशात आघाडीवर असून बांबू लागवडीसाठी सात लाख रुपये हेक्टरी अनुदान शेतकऱ्यांना देण्यात येते. यासाठी दहा लाख हेक्टरचे उद्दीष्टही ठरवण्यात आले आहे. बांबूच्या अनेक प्रजाती असून त्याचे वेगवेगळे फायदे आहेत, त्यामुळे टास्क फोर्सच्या माध्यमातून आम्ही येणाऱ्या काळात पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पाऊले उचलत आहोत.

# ओंकार विद्यामंदिरच्या दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्यामंदिरच्या मार्च २०२४च्या एसएससीचा सेमी इंग्रजी माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



या वेळी हिंदू एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त मनोहर गुरव, मृदुला आबदेव, दीपाली जोशी, मनिषा फाटक, सचिव सुनील विरकुड, मुख्याध्यापिका प्रविता गार्डी, पालक व शिक्षक वृंद उपस्थित होते.

विद्यालयातील प्रथम रुद्राणी हेरंब जोशी, द्वितीय सार्थक संदीप ठाकूर, तृतीय आर्या सुनील बनिय यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून उच्च शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी विद्यार्थ्यांनी, या शाळेत बालवाडीपासून दहावीपर्यंत ज्या शिक्षकांनी संस्काराची शिदोरी देऊन आम्हाला घडविले त्यांना व शाळेला कधीच विसरता येणार नाही, अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

हिंदू एज्युकेशन सोसायटी व भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या शैक्षणिक वर्षापासून इ.११ वी विज्ञान (आयटीसह) शाखेचे वर्ग सुरू करणार असल्याची माहिती दीपाली जोशी यांनी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रोशनी गार्डी यांनी केले.

# गडचिरोली, मुंबई हिवतापग्रस्त

**पुणे :** राज्यात यंदा जानेवारी ते मे या कालावधीत हिवतापाचे तीन हजार ६२ रुग्ण आढळले आहेत. यामुळे आरोग्य विभागाने रुग्णसंख्या कमी करण्यासाठी पावले उचलली आहे.

आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, राज्यात जानेवारी ते ७ मे या कालावधीत हिवतापाचे तीन हजार ६२ रुग्ण आढळले. मुंबईत सर्वाधिक एक हजार ३२४ रुग्ण तर गडचिरोली जिल्ह्यात एक हजार १४२ रुग्णांची नोंद झाली आहे. इतर जिल्ह्यांमध्ये रुग्णसंख्या कमी आहे.

# कोणत्याही गावातून आता पंढरपूर गाठा!

## 'आषाढी'साठी एसटी पाच हजार विशेष बस सोडणार

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदा आषाढी एकादशीनिमित्त राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्यापेक्षा जास्त भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांच्या गावातून थेट पंढरपूरला जाण्यासाठी एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविकांनी जवळच्या आगारात संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळाने केले आहे. आषाढी एकादशीनिमित्त भाविकांसाठी एसटीने पाच हजार विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन केले आहे.

आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरातून लाखो भाविक पंढरपूर येथे जातात. अनेक प्रवासी खासगी वाहने, रेल्वे, एसटी अथवा विविध दिंडीसोबत चालत पंढरपूर गाठतात. यंदा भाविकांना थेट स्वतःच्या गावातून पंढरपूरपर्यंत बससेवा उपलब्ध करण्यात आली आहे. ४०पेक्षा जास्त भाविकांची संख्या असल्यास त्यांना त्यांच्या गावापासून बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकीट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे फुकट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गांवर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे, अशा फुकट्या प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवून असणार आहेत.

स्थानिक पोलीस प्रशासनाबरोबरच ३६पेक्षा जास्त काळ वाहतूक नियंत्रक व सुरक्षारक्षक वाहतूक सुरळीत ठेवण्याचे काम करणार आहेत.

# मुंबई विद्यापीठातर्फे किल्ले रायगडावर स्वच्छता अभियान यशस्वी

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुळकर्णी यांच्या नियोजन व मार्गदर्शनाने मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग व श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्यिषेक सोहळ्यानंतर किल्ले रायगडवर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

मुंबई विद्यापीठाचे एकूण ५० कर्मचारी व डी.जी.तटकरे महाविद्यालय माणगाव, सुंदरराव मोरे महाविद्यालय पोलादपूर, पिलाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रसायनी, जी. एम. वेदक विज्ञान महाविद्यालय तळा, डी.जी. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा, जे.एस. एम महाविद्यालय अलिबाग, दोशी वकील महाविद्यालय गोरेगांव, शेठ जे.एन.पालीवाल महाविद्यालय पाली, एम.बी.मोरे महिला महाविद्यालय धाटाव, डॉ. सी. डी.देशमुख महाविद्यालय रोहा, हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे महाविद्यालय महाड, डॉ.नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय कोलाड,पीलाई इंजिनिअरिंग महाविद्यालय पनवेल, आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालय नागोठणे, वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय मुरूड, सीकेटी महाविद्यालय पनवेल, कोकण ज्ञानपीठ कला व वाणिज्य महाविद्यालय उरण, एम.एम. जगताप महाविद्यालय महाड या सर्व महाविद्यालयातील एकूण ४५० राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकार व स्वयंसेवक सहाभगी झाले होते.

किल्ले रायगडावरील स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकार, स्वयंसेवक व मुंबई विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांनी रायगड किल्ल्यावरील हत्ती तलाव परिसर, गंगासागर तलाव परिसर, कुशावर्त तलाव परिसर, जगदीश्वर मंदिर परिसर, शिरकाई देवूळ परिसर, बाजारपेठेचा विस्तारित परिसर, रत्नशाळा परिसर, नगारखाना परिसर, राजभवन सभोवतालचा परिसर, होळीच्या माळाचा विस्तारित परिसर आदी परिसराची स्वछता वेगवेगळ्या प्रकारच्या कचरा संकलनाचे केली. संकलित केलेला कचरा एकत्रित करून पुढील प्रक्रियेसाठी दिला. या टीमला मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



# मराठवाड्यात जोरदार पावसाने पाणीच पाणी

**परभणी : प्रतिनिधी**

दुष्काळाच्या झळांनी होरपळणाऱ्या मराठवाड्याला मान्सूनच्या सरींनी दिलासा दिला आहे. मराठवाड्यातील बीड, लातूर, परभणी, धाराशिव आणि जालना या पाच जिल्ह्यांमध्ये दोन दिवसांपासून मान्सूनच्या जोरदार सरी बरसत आहेत. त्यामुळे कुठे नदीला पाणी आले, कुठे प्रकल्पाचाही पाणीसाठा वाढला आहे.

परभणीत दोन दिवसात जवळपास ३८ मिमी पाऊस झाला. त्यात केकरजवळा मंडळात अतिवृष्टी झाली. जोरदार पाऊस झाल्याने कोरडी पडलेल्या गोदावरीला पाणी आले आहे, तर लोअर दुधना प्रकल्पात चार टक्क्यांनी पाणीसाठा वाढला आहे. बीड जिल्ह्यातही अनेक वर्षानंतर पहिल्यांदाच जूनमध्ये जोरदार पाऊस झाला. जालन्यातही पावसाचे धुमशान सुरू केले आहे. या दमदार पावसाने बळीराजा सुखवला आहे. लातूरमध्ये पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला असून २४ तासांत ६३.६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.



लातूरमधील आठवडी बाजाराच्या मैदानात पाणी साचल्यामुळे आठवडी बाजार रस्त्यावर भरलाय तर लातूर-उदगीर महामार्गावरील नळेगाव येथील पुलाशेजारील पर्यायी रस्ता वाहून गेल्याने महामार्ग पूर्णपणे बंद आहे. शिरूर-अनंतपाळ-उदगीर राज्य महामार्गावर रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे पर्यायी पूल उभा करण्यात आला होता, तोही पावसामुळे वाहून गेल्याने हा रस्ताही बंद आहे. धाराशिव जिल्ह्यातही मुसळधार पाऊस बरसत आहे. धाराशिव शहरातील बसस्थानकातही पाणी साचल्यामुळे तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे, अनेक गावांचादेखील संपर्क तुटला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशील मे. विराज शिवतेज टी. पी. डेव्हलपमेन्ट प्रा. लि. तर्फे एच.यु.एफ श्री. तानाजी भगवान पाटील सांगली, महाराष्ट्र ह्यांनी खालील वर्णनाचा भूखंड ५०%-५०% विकसनाकरीता घेण्याचे ठरविलेले आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे | मालकाचे नाव | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| पुष्पक दापोली | नारायण गणपत गायकवाड | ०३ | ३४५ | ९४० |

नारायण गणपत गायकवाड यांचे मालकीची जमीन सिडको प्राधिकरणाने नवी मुंबई विमानतळ योजनेकरीता संपादीत केलेली असून संपादीत जमिनीचे मोबदल्यापोटी सिडको प्राधिकरणाकडून २२.५% योजनेप्रमाणे सदरचा भूखंड ६० वर्षे भाडेतत्वावर नारायण गणपत गायकवाड यांना वाटप करण्यात आलेला आहे. तश्याप्रकारचा लिज करार दि. १२/०२/२०१८ रोजी झालेला आहे. आता सदरचा भूखंड आमचे अशील हे नारायण गणपत गायकवाड यांचेकडून ५०%-५०% विकसनाकरीता घेण्याचे ठरविलेले अहे.

तरी सदरहू भूखंडावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क उदा. गहाण, दान, बक्षीस फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा कोणतेही दावे, हूकूमनामे, वाटप, वारसाहक्क, मालकी व अन्य हक्क व हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे विकसनाच्या कराराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे समजून त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल यांची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

तारीख : ११/०६/२०२४
पनवेल

**सही/-**
ॲड. के. के. गोंधळी
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स पनवेल,
जि. रायगड. मोबाईल नं. ९७६८३७३२५५

## निवडक

### सहाय्यक पोलीस निरीक्षकांना बढती




**पनवेल :** शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे व राहुल लोखंडे यांना शासकीय नियमानुसार बढती मिळाली असून ते आता पोलीस निरीक्षक या पदी यापुढे विविध पोलीस ठाण्यात कार्यरत राहणार आहेत. नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक संतोष शेटे यांची बदली पुणे येथे झाली असून नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक राहुल लोखंडे यांची बदली मुंबई येथे झाली आहे. या बढतीबद्दल त्यांच्या मित्र परिवार व पोलीस खात्यातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक

**पनवेल :** प्रेमसंबंध जोडून लग्न करतो असे सांगून महिलेबरोबर वेगवेगळ्या ठिकाणी वारंवार जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवल्याप्रकरणी एका व्यक्तीविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. मोसिन मुजावर (वय ३६, रा.पनवेल) याने एका २९ वर्षीय महिलेबरोबर ओळख करून तिच्या प्रेमसंबंध जोडून लग्न करतो असे सांगितले व तिच्यावर वारंवार जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवले. या प्रकरणी पीडित महिलेने शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याने त्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पनवेलमध्ये हत्तीरोग दूरीकरण कार्यक्रम

## महापालिका कार्यक्षेत्रात आरोग्य केंद्रनिहाय सर्वेक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविला जात आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हत्तीरोग दूरीकरण कार्यक्रम महापालिका कार्यक्षेत्रात राबविला जात आहे. या अंतर्गत महापालिका पनवेल कार्यक्षेत्रात हत्तीरोग सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहेत तसेच हत्तीपाय रुग्णांना दिव्यांगांना प्रमाणपत्र वितरित करण्यात येणार आहे. याबरोबरच अंडवृध्दी शस्त्रक्रिया करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

हत्तीरोगामध्ये हत्तीपाय व अंडवृद्धी ही लक्षणे दिसून येतात. हे दोन्ही आजार सामाजिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आहेत. हत्तीपाय रुग्णामध्ये एका ठराविक वृद्धीनंतर रुग्णाच्या हलचालीवर कमालीची बंधने येतात. रुग्ण मुक्तपणे हिंडू फिरू शकत नाही. अंडवृद्धी या आजारासाठी रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया करून



या आजाराचे प्रमाण निश्चित कमी करता येते.

हत्तीरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत रेंडम पध्दतीने नागरी आरोग्य केंद्र निहाय कार्यक्षेत्र निश्चीत केले आहे. याठिकाणी रात्री ८ ते १२ व सकाळी ६.३० ते ९ यावेळेत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. उदिष्ट पुर्तीकरीता सदर कार्यक्षेत्रात साधारणतः एक वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक काळ हत्तीरोग राव सर्वेक्षण व किटक शास्त्रीय सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

हत्तीपाय आजार असलेल्या रुग्णांना पायावर सूज येऊन पायाच्या तसेच रुग्णाच्या हालचालींवर निंबंध येतात, रुग्ण इतरांच्या मदती शिवाय हालचाल करू शकत नाहीत. त्यामुळे रुग्णाला एक प्रकारचे अंपगत्व प्राप्त होत असते. शासन निर्णयातील तरतूदीनुसार जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या माध्यमातून अशा रुग्णांची तपासणी करून त्यांना दिव्यांग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. पायाच्या सुजेवरून त्याची तीव्रता मोजून त्यांना 'झिरो' प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

### प्रमाणपत्रासाठी आवश्यक मार्गदर्शक सुचना

ग्रेड १ : कायमची शारीरिक कमजोरी १० टक्के पेक्षा कमी
लक्षणे : पायावर सूज दिवसा दिसून येते परंतू रात्री पायावर सूज राहत नाही. कधीतरी ताप येतो यामध्ये कसलीही गुंतागूत नाही.
ग्रेड २ : कायमची शारीरिक कमजोरी १० ते ३९ टक्के लक्षणे: सूज दिवसा व रात्री तशीच राहते पाय लालबुंद होतात. सारखा सारखा ताप येतो.
ग्रेड ३ : कायमची शारीरिक कमजोरी ४० ते ५० टक्के लक्षणे : पायाच्या खालच्या बाजूला सांध्यामध्ये सुरकुत्या दिसून येतात, मात्र पाय लांबविल्यानंतर त्या सुरकुत्या नष्ट होतात. सतत ताप येतो. पायाच्या दोन बोटामध्ये चिखल्या या आजाराप्रमाणे जखमा होतात.
ग्रेड ४ : कायमची शारीरिक कमजोरी ५० टक्क्यांपेक्षा जास्त लक्षणे : पायावर नोड तयार होतात. सतत ताप पायाच्या दोन बोटामध्ये चिखल्या या आजार प्रमाणे जखमा होतात. पायाला घाणेरडा वास येतो.

# कामोठे येथे ओपन जीमचे काम सुरू

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आमदार निधीतून भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून कामोठे सेक्टर ३१ येथे ओपन जीमची उभारणी करण्यात येत आहे. माजी नगरसेवक विकास घरत यांनी सहकाऱ्यांसह जीमच्या कामाची पाहणी केली.

भाजपच्या माध्यमातून पनवेल महापालिका हद्दीतील विभागाचा सर्वांगिण विकास साधला जात आहे. त्यातून या शहरांचा चेहरामोहरा बदलत असून नागरिकांच्या सेवेसाठी अनेक सोयीसुविधा उपलब्ध होत आहेत. याच पार्श्वभूमीवर कामोठे सेक्टर ३१ येथे ओपन जीमची उभारणी करण्यात येत आहे. त्या कामाची पाहणी विकास घरत, स्वप्निल पाटील आणि भावेश खोत यांनी केली.



# सराईत मोटरसायकलचोर पनवेल पोलिसांच्या ताब्यात

## सव्वा लाखाच्या पाच दुचाकी हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलसह नवी बमुंबई, खारघर परिसरात मोटरसायकल चोरणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून जवळपास एक लाख २२ हजार रुपये किंमतीच्या चोरीच्या पाच मोटरसायकली हस्तगत केल्या आहेत.

खारघर रेल्वे स्टेशनबाहेर यशस्वी फाईन डाईन हॉटेलसमोर करण दोरे यांची मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. चोरट्याचा शोध गुन्हे शाख कक्ष २ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी, सहाय्यक निरीक्षक प्रवीण फडतरे, उपनिरीक्षक मानसिंग पाटील, दिलीप भंडे, सुनील गिरी यांच्यासह हवालदार रमेश शिंदे, अनिल पाटील, मधुकर गडगे, तुकाराम सुर्यवंशी, रणजित पाटील, रुपेश पाटील, इंद्रजित कानू, दीपक डोंगरे, निलेश पाटील, सागर रसाळ, नाईक आजिनाथ फुंदे, हवालदार अजित पाटील, शिपाई विक्रांत माळी आदींचे पथक सराईत गुन्हेगाराचा शोध गुप्त बातमीदार, तांत्रिक तपास व सीसीटीव्ही फुटेच्याद्वारे घेत असताना सराईत आरोपी शोएब शेर खान (वय २१) याची ओळख पटली.

यानुसार कळंबोली परिसरात सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. अधिक तपासामध्ये त्याने वेगवेगळ्या प्रकारच्या पाच मोटरसायकली ज्याची किंमत जवळपास एक लाख २२ हजार रुपये इतकी आहे. या चोरीच्या मोटरसायकली पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. त्याच्या अटकेमुळे अजूनही काही चोरीच्या मोटरसायकली हस्तगत होण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे.

# मासेमारी बंदीमुळे मासळीची आवक घटली

**उरण : वार्ताहर**

एक जूनपासून ३१ जुलैपर्यंत शासनाच्या खोल समुद्रातील पावसाळी ६१ दिवसांच्या मासेमारी बंदीच्या आदेशानंतर मासळीची आवक घटली आहे. यामुळे मात्र मासळीचे भाव चांगलेच कडाडले आहेत. पश्चिम तटवर्ती समुद्री क्षेत्रातील मासेमारी बंदीचे आदेश जारी केले आहेत. यामुळे हजारो मच्छीमार बोटींनी करंजा, मोरा, रेवस, मुळेखंड, खोपटा, वशेणी, गव्हाण आदी विविध खाडीतील बंदरात नांगर टाकून विसावल्या आहेत.

पावसाळी मासेमारी बंदीदरम्यान दररोज बाजारात येणाऱ्या विविध प्रकारच्या मासळीची आवक पुरती घटली आहे. त्यामुळे बाजारात मासळीचा तुटवडा जाणवत आहे. पापलेट, घोळ, जिताडा, माकूळ, कलेट, सुरमई, रावस, हलवा आदी चांगल्या प्रतीची मासळी तर पावसाळी मासेमारी बंदीनंतर तर बाजारात दिसेनाशी झाली आहे. मिळालीच तर अशा चांगल्या प्रतीच्या मासळीचे भाव सामान्यांच्या आवाक्याबाहेरचे आहेत.



त्यामुळे स्थानिक मच्छीमारांकडून डोल, वावरी, खांदा, फग, वाणे आदी प्रकारातून पकडून बाजारात येणाऱ्या बोंबील, मांदेली, चिवणी, वाकटी, बांगडे, निवट्या, कालवं, भिलजी, वाम आदी दुय्यम प्रकारच्या मासळीवर खवय्यांना समाधान मानावे लागत आहे. मासळीच्या तुटवड्यामुळे मात्र दरवर्षीप्रमाणे यंदाही मासळीचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे मासळी खवय्यांची पंचाईत झाली आहे.

पावसाळी मासेमारी बंदीची मुदत संपुष्टात येईपर्यंत आणि मासळीची आवक वाढीपर्यत मासळीचे भाव सामान्यांच्या आवाक्यात येणे अवघडच असल्याच्या प्रतिक्रिया मासळी व्यावसायिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

बंदी आधीचे दर बंदीनंतरचे दर पापलेट आधी ८०० ते १००० किलो नंतर १००० ते १५००, सुरमई आधी ७०० ते ८०० किलो नंतर ८०० ते १०००, कोळंबी आधी ४५० ते ५५० किलो नंतर ७०० ते ८००, रिबनफिश आधी ७५ ते ८० नगास नंतर १५० ते २००, हलवा आधी ४०० किलो नंतर ५५० ते ६५० किलो, माकुळ आधी ५०० ते ७०० नग नंतर ८००च्या पुढे, रावस आधी ६०० ते ८०० किलो नंतर ८०० ते १०००, जिताडा आधी १००० किलो नंतर १२००, बांगडा आधी ३ नगास १०० ते १५० आता २०० अश्या दराने मच्छी विकली जात आहे.

# कपडे धुण्यासाठी गेलेल्या महिलेचा मुलासह बुडून मृत्यू

## उरणच्या पिरकोन गावातील घटना

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील पिरकोन गावात कपडे धुवण्यासाठी तळ्यावर गेलेल्या आई व मुलाचा तळ्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.




पिरकोन गावात निरा जगदीश पाटील (वय २५) या त्यांचा मुलगा रिहान जगदीश पाटील (वय ७) याला घेऊन तळ्याकाठी कपडे धुवण्यासाठी गेल्या होत्या. निरा या कपडे धुवत असतांना रिहानचा पाय घसरला व रिहान पाण्यात पडला, रिहान पाण्यात पडल्याचे पाहून त्याला वाचवण्यासाठी आईनेदेखील पाण्यात उडी मारली व रिहानला हाताशी घेतला, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने निरा या पाण्यात ओढली गेली व ही महिला मुलासह तळ्यातील पाण्यात बुडाली. घरी परत न आल्याने नीरा यांचे सासरे हे तळ्याकाठी पाहण्यासाठी आले. त्यांना तळ्याकाठी धुवण्यासाठी आणलेले कपडे, व चपला दिसल्या, मात्र आई निरा व रिहान काही दिसले नाही. त्यामुळे त्यांनी आजूबाजूला शोध घेतला. त्यांनी आरडाओरडा सुरू केला. त्यांचा आरडाओरडा ऐकून ग्रामस्थ तळ्याकाठी आले व त्यांनी तळ्यात शोध घेतला असता निरा यांच्या हातात त्यांचा मुलगा रिहान होता. तळ्यातून दोघांना वर काढले असता, दोघांचाही नाकातोंडात पाणी जाऊन मृत्यू झाला होता.

उरण पोलीस ठाण्यात याप्रकरणी अकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याचे उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कोते यांनी दिली आहे. या घटनेची आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे.

# अपघातात ट्रकचालक ठार

**पनवेल :** रस्त्यालगत उभ्या करून ठेवलेल्या ट्रेलरवर पाठीमागून आलेल्या भरधाव ट्रकने दिल्याने झालेल्या अपघातात ट्रकचालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील जेएनपीटी-पळस्पे मार्गावर पुष्पकनगर येथे घडली आहे.

ट्रक चालक शहादेव किसन आंधळे (वय ३९) याने त्याच्या ताब्यातील ट्रक घेवून तो जेएनपीटी ते पळस्पे मार्गावरुन पनवेलच्या दिशेने जात होता. या वेळी अंधारामुळे पुष्पकनगर जवळ रस्त्यालगत उभा ट्रेलर त्यांच्या लक्षात न आल्याने त्यांचा ट्रक ट्रेलरवर जावून धडकला. यात शहादेव आंधळे यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


# तळोजा एमआयडीसीत प्रदूषण वाढले

## कासाडी नदीचे पाणी सातत्याने होतेय लाल

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक विभागातील कारखान्यातून सोडण्यात आलेल्या विघातक विषारी पाण्याने कासाडी नदीला लाल रंग आला आहे. या बेसुमार वाढत्या विघातक प्रदूषनाने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून त्यांचे जीवनच उद्ध्वस्त झाले आहे. त्यांना अनेक आजारांना सामना करावा लगत आहे. या विषारी प्रदूषणापासून नागरिकांची सुटका करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे करण्यात आली आहे.

तळोजा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प तळोजा औद्योगिक विकास मंडळाकडे गेल्यापासून कासाडी नदीच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी बेलापूर व तळोजा औद्योगिक विकास मंडळ याच्यामधून विस्तव जात नसल्याने याची किंमत येथील स्थानिक नागरिकांना मोजावी लागत आहे. गेली काही दिवसापासून रात्री कारखान्यातून विघातक पाणी सोडण्यात येत आहे. दीपक



कंपनी ते वलप गणेशनगर विसर्जन घाट दरम्यानच्या कासाडी नदीचे पाणी लालच लाल झाले आहे. याची माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळ नवी मुंबई व तळोजा तळोजा औद्योगिक विकास मंडळ यांना देण्यात आली असता कासाडी नदीच्या पाण्याचे



नमुने घेण्यात आले, पण त्यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

कासाडी नदीतील पाणी जमिनीत मुरले जावून नागरिकांच्या पिण्यात येऊन त्यांना आस्थमा, छातीत जळजळ, फुफ्फुसाचे आजार जडले आहेत. तर लहान मुलांची वाढ खुंटत असून अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे.

तळोजा सांडपाणी प्रकल्पाला वाहून आणणाऱ्या वाहिन्या दिशाहीन व्यवस्थापनामुळे टाकण्यात आल्याने त्या जागोजागी जाम झाल्यावा फुटल्या आहेत. या वाहिन्यांचे चेंबर जाम झाल्याने कारखान्यातील विघातक पाणी थेट कासाडी नदीत जात आहे.

# महावितरणच्या को-एमडीपदी रिचर्ड यानथन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कोकण परिक्षेत्राच्या सहव्यवस्थापकीय संचालक (को-एमडी)पदी रिचर्ड यानथन यांनी सुत्रे स्वीकारली.

रिचर्ड यानथन हे २०२०च्या तुकडीतील भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी आहे. महावितरण कंपनीत येण्यापूर्वी यानथन अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यात उपविभागीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) म्हणून कार्यरत होते. यानथन यांनी गुवाहाटी येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय येथून स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी घेतली आहे.



**उरण : भाजप शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुका उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर, सागर मोहिते, सविन म्हात्रे, रोहित कोळी, विनायक कोळी आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# मोरा ग्राइंडवेल कंपनीत विविध कार्यक्रम



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोरा येथील ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड कंपनीमध्ये सालाबादप्रमाणे यंदाही श्री सत्यनारायण महापूजा नुकतीच आयोजित करण्यात आली. दरम्यान, या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पूजेसाठी कामगार विरेंद्र जाधव आणि परिवार बसले होते. सचिन उपाध्ये गुरुजी यांनी यथासांग पूजा सांगितली.

बिझनेस हेड कमलजीत सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली या पूजेचे आयोजन करण्यात आले. या वेळी ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड कारखाना प्रमुख राहुल देशक, सिनिअर ॲडमीनीस्टेशन मॅनेजर आय. बी. सिंग, मार्केटींग हेड प्रकाश पाटील, ॲडमीन डिपार्टमेंटचे गणपत दाटेकर, कामगार युनियन प्रतिनिधी, कामगार वर्ग, स्टाफ आदी उपस्थित होते.

कामगार, स्टाफ, कंत्राटी कामगार यांच्यासाठी महाप्रसादचे आयोजन करण्यात आले होते. प्रसाद व स्वीट सर्वांना देण्यात आले. सर्व कामगार, युनियन प्रतिनिधी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या घंटागाडीच्या धडकेने एक दुचाकीचालक ठार झाला आहे. अंजनीकुमार मौर्या (वय २२) असे मृत तरुणाचे नाव असून खारघर हिरानंदानी उड्डाणपुलाजवळ हा अपघात झाला, ज्यामध्ये त्याचा मृत्यू झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपी वाहनचालक विकास पाटील (वय ४४) याला खारघर पोलिसांनी अटक केली आहे. मयत तरुण हा स्वीगी फुड ॲपसाठी काम करीत होता. या अपघातादरम्यानही हा तरुण कामावर होता. दरम्यान, शहरातील स्विगीचालकांनी खारघर पोलीस ठाण्यात धडक देण्याचा प्रयत्न केला.

# मानसिक रुग्ण तरुणी पोहचली सलमान खानच्या फार्म हाऊसवर

**पनवेल : वार्ताहर**

सलमान खान सोबत लग्न करण्याच्या हट्ट धरलेली २५ वर्षीय तरुणी सलमान खानच्या पनवेलजवळील फार्म हाऊस जवळ पोहचली. पोलिसांनी समजावल्यानंतर तिला जवळच्या आश्रमामध्ये नेण्यात आले. त्यानंतर तिला एमजीएम रुग्णालय कामोठे या ठिकाणी उपचारासाठी दाखल करण्यात आले.

पंचवीस वर्षीय तरुणीचे एका तरुणासोबत प्रेमसंबंध होते. या मुलाने तिला लग्नासाठी नकार दिला. याचा तिला धक्का बसला व त्यानंतर तिने सलमान खानसोबत लग्न करायचा आहे यासाठी पनवेल गाठले. ही तरुणी यापूर्वी पाच वर्षे दिल्लीत राहायची. यापूर्वी ती तीन वेळा घराबाहेर गेली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ती मानसिक रुग्ण आहे. ती सलमान खानसोबत लग्न करायचे आहे असा चंग बांधून पनवेल तालुक्यातील सलमान खानच्या फार्म हाऊसच्या दिशेने निघाली. नेरे परिसरात आल्यानंतर तिने गोंधळ घालण्यास सुरुवात केली. याची माहिती पनवेल तालुका पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी तिची चौकशी केली त्यानंतर तिने सलमान खानसोबत लग्न करायचे आहे असे सांगितले.

तरुणी मानसिक रुग्ण असल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी काही काळाकरिता तिला जवळच्या आश्रमात उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर तिच्यावर सध्या एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचार सुरू आहेत.


## संपादकीय


# सहमतीचे सुखस्वप्न

तंत्रज्ञानाचा गैरवापर करून विरोधकांनी लोकसभा निवडणुकांदरम्यान जो खोटा प्रचार केला, चुकीचे नॅरेटिव तयार करण्याचा खटाटोप केला, त्याबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. सरसंघचालकांचे भाषण हे फक्त राजकारण्यांनीच ऐकावे, असे नव्हे. तर ते सामान्य जनतेनेही समजून घ्यायला हवे. विशेषत: नवमतदारांनी त्यांच्या विचारांकडे अधिक अभ्यासपूर्ण पध्दतीने पाहायला हवे.

**जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशात ज्या प्रकारे निवडणुकांसारखा अवाढव्य कार्यक्रम यशस्वीपणे पार पडतो, त्याचा सर्वांनाच अभिमान वाटायला हवा. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत तब्बल ६४ कोटींहून अधिक मतदारांनी आपला हक्क बजावला आणि तिसऱ्यांदा मोदी सरकारवरच शिक्कामोर्तब केले. अठराव्या लोकसभेसाठीची ही निवडणूक दीर्घकाळ लक्षात राहणारी ठरली. सात टप्प्यात झालेल्या या निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी विरोधकांनी जी खालची पातळी गाठली, ती अनेक सुजाणांना व्यथित करणारी होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टीकेचे लक्ष्य करताना विरोधी आघाडीच्या नेत्यांनी पुरते ताळतंत्र सोडले. खोटेनाटे आरोप, चिखलफेक, शिवराळ भाषा, खोटे नॅरेटिव पसरवणे, तंत्रज्ञानाचा बिनदिक्कत दुरुपयोग करत जमेल त्या मार्गाने असत्य प्रचार करणे असे सारे प्रकार विरोधकांनी केले. काही प्रमाणात त्यांना यशदेखील आले हे आकडेवारीवरून दिसतेच आहे, परंतु इतके आकाशपाताळ एक करूनही विरोधकांच्या हाती काहीच लागले नाही. तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली ती नरेंद्र मोदी यांनीच. मंत्रिमंडळातही भारतीय जनता पक्षाच्या जुन्या जाणत्या सहकाऱ्यांनाच स्थान देण्याचा निर्णय मोदी यांनी घेतला. शपथविधीनंतर काही तासांतच मोदी सरकार पुन्हा एकदा कामाला लागलेदेखील. या साऱ्या घडामोडींबाबत भाजपची मातृ संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला काय वाटते याबद्दल साऱ्यांनाच उत्सुकता होती. सोमवारी कार्यकर्ता विकास मेळाव्यात नागपूर येथे बोलताना सरसंघचालक आदरणीय मोहन भागवत यांनी जे विचार व्यक्त केले, त्यामुळे ही उत्सुकता शमली असेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही बिगर राजकीय संघटना आहे. भाजपमधील बहुतेक नेते या संघटनेच्या मुशीतूनच तावून सुलाखून निघालेले असतात, हा भाग वेगळा. संघामध्ये जी करडी शिस्त शिकवली जाते, त्याचा खूप फायदा भाजपच्या कार्यकर्त्यांना नेहमी होत असतो. कार्यकर्ता विकास वर्गातूनच असे शिस्तबध्द कार्यकर्ते तयार होत असतात. या कार्यकर्त्यांसमोर बोलताना सरसंघचालकांनी व्यक्त केलेले विचार अत्यंत मौलिक आणि मार्गदर्शक आहेत, यात शंका नाही. संत कबीरांचा दोहा म्हणून दाखवत भागवत यांनी निवडणुकीच्या काळात प्रचाराची जी पातळी गाठली गेली, त्यावर कडक शब्दांत कोरडे ओढले. त्यातून कुठलाही पक्ष सुटला नाही. अर्थात विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीतील नेत्यांच्या ते सारे डोक्यावरून जाईल किंवा ते त्याकडे दुर्लक्ष तरी करतील. आपण लोकशाहीचे काय मातेरे केले आहे, याची जाणीव या विरोधकांमध्ये औषधालादेखील उरलेली नाही, हेच सत्य आहे. सेवकाने अहंकार बाळगायचा नसतो, या प्राचीन तत्त्वाचीही भागवत यांनी आठवण करून दिली. भागवत यांच्या भाषणातून व्यक्त झालेले चिंतन लोकशाही कशी असायला हवी, याबद्दल सुस्पष्ट विचार दर्शवते. एकप्रकारे ते वर्तमान काळातील राजकीय नेत्यांसाठी झणझणीत अंजन आहे आणि नव्या पिढीसाठी राज्यशास्त्राचा नवा वस्तुपाठच आहे. भागवत यांच्या भाषणातील विचारांबरहुकूम आपल्या देशातील लोकशाही चालू राहिली, तर भारताला उज्वल भवितव्य लाभेल, यात शंका नाही.**

# ...म्हणून म्हणावेसे वाटते, माणसापरिस माकडे बरी!





**खबरबात**
नितीन देशमुख

जागतिक बँकेच्या अहवालानुसार भारतात रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू होतात. भारतात दर तासाला ५३ अपघात होतात. दर चार मिनिटाला एकाचा मृत्यू होतो. सिग्नल क्रॉस करणे, ओव्हरटेक करणे, चुकीच्या दिशेने गाडी चालवणे, मोबाईलवर बोलत गाडी चालवणे, रस्त्यांची खराब स्थिती, वाहन चालकाची चूक व पायी चालणाऱ्या लोकांची चूक अशा अनेक गोष्टी अपघातांसाठी कारणीभूत असल्याचे दिसून आले आहे. आपण अनेक वेळा रस्ता ओलांडण्यासाठी असलेल्या पूलाचा वापर करीत नाही त्यामुळे अपघात घडतात. पनवेल तालुक्यातील कर्नाळा अभयारण्यातील माकडे एखाद्या शहाण्या माणसाप्रमाणे महामार्ग ओलांडताना त्यांच्यासाठी खास बनवलेल्या मंकी लॅडरचा वापर करताना दिसतात. त्यावेळी म्हणावसे वाटते, 'माणसापरिस माकड बरी'.

कर्नाळा अभयारण्य जरी पक्ष्यांसाठी प्रसिद्ध असले तरीसुद्धा या अभयारण्यात वन्यप्राणी जीवन बघायला मिळते. रानडुक्कर, ससे, माकड, रानमांजर, भेकर, कोल्हा, मुंगूस, साळींदर आणि वानरांच्या काही जाती आणि क्वचित एखादा बिबट्या या अभयारण्यात आढळतो. या अभयारण्यातून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग जातो. या महामार्गावरून अनेक पर्यट्क जात असतात. या महामार्गाच्या दुतर्फा वन खात्याने माकडे रस्त्यावर येऊ नये यासाठी पत्र्याचे कंपाउंड केले आहे. माकडांना रस्ता ओलांडून पलीकडे जाण्यासाठी १० भुयारी मार्ग ठेवण्यात आले आहेत. याशिवाय मंकी लॅडर बनविण्यात आला आहे. त्याचा वापर करून अनेक वेळा माकडे रस्त्यापलीकडे जाताना दिसतात.

कर्नाळा अभयारण्यामध्ये रस्त्याच्या बाजूच्या झाडावर किवा कंपाउंडच्या पत्र्यावर बसलेली माकडे पाहून रस्त्याने जाणारे पर्यटक वन खात्याने लावलेल्या प्राण्यांना खायला देऊ नका, दंड आकाराला जाईल या फलकाकडे दुर्लक्ष करून त्यांना केळी, वेफर्स व इतर पदार्थ खायला देतात. ते घेण्यासाठी रस्त्यावर उडी मारून माकडे रस्ता ओलांडून येताना दुसर्या वाहनाखाली येऊन महिन्याला तीन-चार माकडांचा मृत्यू होतो. माणसांचे रस्ता ओलांडताना अपघाती मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त आहे. कारण रस्त्यावरून येणारे वाहन व सिग्नल न बघता किंवा अनेक वेळा मोबाईलवर बोलत रस्ता ओलांडल्यामुळे अपघात होतो.



त्यामुळे मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व येते. त्यावेळी रस्ता ओलांडण्यासाठी मंकी लॅडरचा वापर करणारी माकडे पाहून दादा कोंडकेंच्या 'एकटा जीव सदाशिव' चित्रपटातील 'माणसापरिस मेंढरा बरी' या मध्ये बदल करून 'माणसापरिस माकडे बरी' म्हणण्याची वेळ आली आहे. याशिवाय माकडांना केळी, वेफर्स व इतर पदार्थ खायला देऊन आपण मुक्या प्राण्यांच्या आरोग्याशी खेळतोय याची कल्पनासुध्दा कोणीच करीत नाही. याबाबत आता प्राणीप्रेमी संघटनांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

बँकॉक इथल्या फ्लोटिंग मार्केटमधील एक माकड 'अंकल फॅटी' म्हणून प्रसिद्ध आहे. पर्यटकांनी फेकलेले जंक फूड खाऊन खाऊन या माकडाचे पोट एवढे सुटले आहे की त्याचे हिंडणे फिरणेही आता अवघड झाले आहे. या माकडाचे वजन त्याच्या मूळच्या वजनापेक्षाही दुप्पट वाढलेय. वजनामुळे त्याला नीट हिंडता फिरताही येत नाही, पण लोकांना आणि इथल्या पर्यटकांना मात्र हे लठ्ठ माकड पाहून फारच गंम्मत वाटते. जनजागृतीसाठी याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. शेवटी इथल्या प्राणीप्रेमी संघटनांनी पुढाकार घेतला आहे आणि लवकरच या लठ्ठ माकडाला 'फॅट कँम्प'मध्ये पाठवण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. येथे उपचार करून त्यांचे वजन कमी करण्यात येईल.

कोरोना होता त्यावेळी रस्त्यावर पर्यटक नसल्याने वानरे रस्त्यावर येत नव्हती. आता पुन्हा रस्त्यावर खायला मिळते म्हणून रस्त्याच्या कडेला झाडावर किवा पत्र्यावर बसतात. खायला दिल्यावर रस्त्यावर येतात. आम्ही त्यासाठी फिरत असतो कोण खायला देताना दिसल्यास दंड वसूल करतो, असे वनरक्षकांनी सांगितले.

# लोकप्रिय लेखक पु. ल. देशपांडे



पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु. ल. देशपांडे उर्फ भाई उर्फ पुल हे लोकप्रिय मराठी लेखक, नाटककार, नट, कथाकार व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक होते. त्यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

पु. ल. देशपांडे यांचा जन्म ८ नोव्हेंबर १९१९ रोजी मुंबईतील गावदेवी या भागात झाला. पार्ले टिळक विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून पुल मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएलबी झाले आणि कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात काही काळ नोकरी करून पुण्याला आले. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बी.ए.आणि नंतर एम.ए. केले.

१९३७ पासून नभोवाणीवर पुल मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले. त्या वर्षी त्यांनी अनंत काणेकरांच्या 'पैजार' या श्रुतिकेत काम केले. २०१४ मध्ये प्रकाशित झालेले 'बटाट्याची चाळ' हे त्यांचे विनोदी पुस्तक प्रसिद्ध आहे. १९४८ साली पुल यांनी 'तुका म्हणे आता' हे नाटक आणि 'बिचारे सौभद्र' हे प्रहसन लिहिले. १९४७ ते १९५४ या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये आणि चित्रपटांसाठी काम केले. 'वंदे मातरम', 'दूधभात' आणि 'गुळाचा गणपती' या चित्रपटांत अष्टपैलू कामगिरी केली. १९४७ सालच्या 'कुबेर' चित्रपटाला त्यांनी संगीत दिले.

पुल यांनी 'अंमलदार','गुळाचा गणपती','घरधनी','चोखामेळा', 'दूधभात', 'देव पावला', 'देवबाप्पा', 'नवराबायको', 'नवे बिर्हाड', 'मानाचे पान' आणि 'मोठी माणसे' या अकरा चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले. याशिवाय ज्योत्स्ना भोळे, माणिक वर्मा व आशा भोसले यांच्याकडून पुलंनी गाऊन घेतलेल्या भावगीतांची संख्या विशीच्या घरात जाईल. १९५५ मध्ये पुल 'आकाशवाणी'त (ऑल इंडिया रेडिओत) नोकरीला लागले. आकाशवाणीसाठी त्यांनी अनेक श्रुतिका लिहिल्या आणि भाषणे दिली. ५६-५७ मध्ये ते आकाशवाणीवर प्रमुख नाट्यनिर्माता झाले. अशा या लोकप्रिय लेखकाचे १२ जून २००० रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

### 'या' देशात गुगल पे बंद करण्याचा निर्णय

सध्या तंत्रज्ञानाचे युग आहे. कधीकाळी बँकेशी संबंधित एखादे काम करण्यासाठी पूर्ण दिवस जायचा. आता मात्र तुम्ही पैशांचे व्यवहार मोबाईल किंवा इंटरनेट बँकिंगच्या माध्यमातून काही सेकंदांत पूर्ण करू शकता. यूपीआयच्या मदतीने ऑनलाईन पद्धतीने पैशांचे व्यवहार करणे आणखी सोपे झाले आहे. ऑनलाईन पेमेंट क्षेत्रात रोज नवनवे बदल होत असतात. सध्या ऑनलाईन पेमें प्लॅटफॉर्म गुगल पेने मोठे निर्णय घेतला आहे. सध्या गुगल पे हे ॲप एका देशात बंद करण्यात आले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार अमेरिकेत ४ जून २०२४ पासून गुगल पे हे ॲप बंद करण्यात आले आहे. हा निर्णय नेमका का घेण्यात आला? याबाबत नेमके आणि ठोस कारण समोर आलेले नाही. गुगल पे हे ॲप ऑनलाईन व्यवहारांसाठी सुरक्षित मानले जाते. भारताने वापराच्या बाबतीत हे ॲप दुसऱ्या क्रमांकावर आहे. असे असताना अमेरिकेत हे ॲप बंद करण्यामागचं कारण काय? असं विचारलं जातंय.

गुगलने अमेरिकेत गुगल पे हे ॲप बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेत गुगलकडून गुगल वॉलेटला प्रमोट केलं जातंय. तसेच ऑनलाईन पेमेंट आणखी सोपे व्हावे यासाठी गुगलकडून प्रयत्न केले जात आहेत. याच कारणामुळे अमेरिकेत गुगल पे बंद करण्यात आल्याचे म्हटले जात आहे.


भारतात मात्र गुगल पे हे ॲप बंद होणार नाही. ते भारतात जसे आहे, तसेच चालू राहील. भारत ही एक मोठी बाजारपेठ आहे. हे ॲप वापरून आर्थिक व्यवहार करणाऱ्यांचे भारतात मोठे प्रमाण आहे. हे ग्राहक हातातून जाऊ नयेत म्हणून गुगल पे या ॲपची सुविधा भारतात चालूच राहील. दुसरीकडे अमेरिकेत गुगल पेच्या तुलनेत गुगल वॉलेट वापरणाऱ्यांचे प्रमाण हे पाच पट अधिक आहे. याच कारणामुळे अमेरिकेत गुगल पे हे ॲप बंद केले जात आहे. गुगलने अमेरिकेत गुगल वॉलेट हे ॲप २०२२ साली लॉन्च कले होते. हेच ॲप भारतात २०२४ साली लॉन्च करण्यात आले. गुगल वॉलेट हे ॲप सध्या गुगल पेवर उपलब्ध आहे.

अमेरिकेत गुगल पे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परिणामी तेथे गुगल पे वापरणाऱ्यांना थेट गुगल वॉलेट वापरायला चालू करावे लागणार आहे. कंपनीने याआधी सांगितल्यानुसार भविष्यात १८० देशांत गुगल पेच्या ऐवजी गुगल वॉलेट हेच चालू ठेवले जाणार आहे. या देशांत गुगल वॉलेट बंद केले जाणार आहे.

# साहित्यिक गोविंदराव सदाशिव टेंबे

भारतीय गणिती व खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्ट यांचा आज जन्मदिन आहे. कलियुगाची ३,६०० वर्षे संपली तेव्हा आपले वय २३ वर्षांचे होते असेही त्यांनी या ग्रंथात म्हटले आहे. यावरून त्यांचे जन्म वर्ष इ. स. ४७६ असावे असा निष्कर्ष तज्ज्ञांनी काढला आहे.

भारतीय गणित परंपरेतील प्रथम सहस्रकातील पहिले उल्लेखनीय गणितज्ञ. यांच्या जन्मस्थानाबद्दल निश्चित माहिती नाही, परंतु त्यांनी आपल्या आर्यभटीय किंवा आर्यसिद्धांत या ग्रंथात कुसुमपूर येथे ज्ञान प्राप्त केल्याचा उल्लेख केला आहे. यावरून त्यांचे अध्ययन आताच्या बिहार राज्यातील पाटणा शहराच्या परिसरात झाले असावे, असा अंदाज आहे. कलियुगाची ३,६०० वर्षे संपली तेव्हा आपले वय २३ वर्षांचे होते असेही त्यांनी या ग्रंथात म्हटले आहे. यावरून त्यांचे जन्म वर्ष इ. स. ४७६ असावे असा निष्कर्ष तज्ज्ञांनी काढला आहे. आर्यभटीय या संस्कृत छंदोबद्ध पद्यात लिहिलेल्या त्यांच्या ग्रंथात गीतिकापाद , गणितपाद, कालक्रियापाद आणि गोलपाद अशी चार प्रकरणे असून अनुक्रमे १३, ३३, २५ आणि ५० अशी एकूण १२१ पद्ये आहेत.



**निमित्त**

गीतिकापाद प्रकरणात खगोल गणितातील मोठ्या संख्या थोडक्यात लिहिण्यासाठी अभिनव संख्या लेखनपद्धती दिली आहे. याशिवाय गीतिकापाद प्रकरणात राशी, अंश, कला यांचे परस्परसंबंध, युगपद्धती, ग्रहांच्या गती, अंतर मोजण्याची मापे इत्यादी विषय आहेत. संख्या लेखनपद्धतीत क् पासून म् पर्यंतच्या २५ व्यंजनांच्या किंमती अनुक्रमे १ ते २५ घेऊन ती व्यंजने वर्गस्थानी आणि य्, र्, ल्, व्, श्, ष्, स् आणि ह्या आठ व्यंजनांच्या किंमती अनुक्रमे ३०, ४०, ५०, १०० अशा घेऊन ती व्यंजने अ वर्गस्थानी लिहावी असा नियम आहे. अ, इ, उ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ आणि औ अशा नऊ स्वरांमध्ये लघु-गुरू भेद न करता प्रत्येक स्वरासाठी अनुक्रमे १००, १०२, १०४ अशी एक स्थानीय किंमत आहे. एखाद्या अक्षराने दर्शविलेली संख्या = प्रत्येक अक्षरातील व्यंजनांची बेरीज गुणिले त्या अक्षरातील स्वराची स्थानीय किंमत आणि एखाद्या शब्दाने दर्शविलेली संख्या = त्या शब्दातल्या प्रत्येक अक्षराने दर्शविलेल्या संख्यांची बेरीज.

उदाहरणार्थ, ख्यु घृ या शब्दात ख्यु = ख् + य् + उ आणि घृ = घ् + ऋ

तसेच ख् = २, य् = ३०, घ् = ४, उ = १०४, ऋ = १०६,

त्यामुळे ख्यु घृ = (२+३०)×१०४ + ४ × १०६= ३,२०,००० + ४०,००,००० = ४३,२०,०००.

ही पद्धत लघु आणि तर्कशुद्ध असली तरी काही संख्यांसाठी येणारे शब्द उच्चारण्यास कठीण आहेत.

गणितपाद प्रकरणात अंकगणित, बीजगणित, भूमिती आणि त्रिकोणमिती या विषयांचा समावेश आहे. यामध्ये सूत्रे कमीत कमी शब्दांमध्ये दिलेली असून सिद्धता दिलेल्या नाहीत. सर्वप्रथम दशमान पद्धतीने एक, दश, शत, सहस्र, अयुत, नियुत, प्रयुत, कोटि, अर्बुद आणि वृन्द अशी दहा संख्या स्थाने दिली आहेत. त्यानंतर वर्ग आणि घन यांच्या व्याख्या भूमिती आणि बीजगणित या दोन्ही संदर्भात देऊन पुढे पूर्णांक संख्यांसाठी वर्गमूळ आणि घनमूळ काढण्याच्या पद्धती दिल्या आहेत. अशा या महान गणितज्ञाचे अंदाजे इ.स. ५५० रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : पावसाने अगदी वेळेत आगमन केल्याने वातावरणातील उकाडा नाहीसा झाला आहे. अशा आल्हाददायक पावसात मनोसक्त भिजण्याचा आनंद घेणारी मुले.**

## आरोग्य प्रहर

### ऋतुमानानुसार आपल्या आहारात करा बदल

ऋतुमानानुसार आहारात आवश्यक बदल केले पाहिजेत. म्हणून पुढे दिलेले आहार नियम पाळा आणि आजार टाळा.



चैत्र (मार्च-एप्रिल) - या महिन्यात गुळाचे सेवन करा. कारण गुळामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि तुमचे रक्त शुद्ध होते. चैत्र महिन्यात कडुलिंबाची पाने चघळल्याने शरीरातील दोष दूर होतात.

वैशाख (एप्रिल-मे)- वैशाख महिन्यात उन्हाळा सुरू होतो. या महिन्यात बेल पत्राचा अवश्य वापर करावा, ज्यामुळे तुमचे आरोग्य चांगले राहील. वैशाख महिन्यात तेलकट पदार्थ कमी खा, कारण त्यामुळे तुमचे शरीर ते पचवू शकत नाही.

ज्येष्ठ (मे-जून) - हा महिना भारतातील सर्वात उष्ण आहे. थंड ताक, लस्सी, ज्यूस आणि शक्य तेवढे पाणी सेवन करावे. शिळे अन्न, जड अन्न आणि गरम पदार्थ खाऊ नका. कारण ते आजाराला आमंत्रण ठरते.

आषाढ (जून-जुलै) - आषाढ महिन्यात आंबा, जुना गहू, सत्तू, जव, तांदूळ, खीर, थंड पदार्थ, काकडी इत्यादींचा वापर करा आणि पावसाळा सुरू झाल्यामुळे तेलकट पदार्थ चालू शकतील पण त्याचा अतिरेक झाला तर पोटबिघाड होईल.

श्रावण (जुलै-ऑगस्ट) - अन्न सेवनाचे प्रमाण कमी करा - जुना तांदूळ, जुना गहू, खिचडी, दही आणि पचायला हलके अन्न घ्या.

भाद्रपद (ऑगस्ट-सप्टेंबर) - या महिन्यात हलके आणि सहज पचणारे अन्न खावे, पावसाळ्यामुळे पचनशक्तीही मंदावते, त्यामुळे सहज पचणारे अन्न खा. या काळात उत्सव असल्याने गोड धोड खाताना पथ्य सांभाळा आणि प्रमाणात खा.

आश्विन (सप्टेंबर-ऑक्टोबर) - या महिन्यात दूध, तूप, गूळ, नारळ, सुकी द्राक्षे, कोबी इत्यादींचे सेवन करू शकता. या महिन्यात आपली पचनशक्ती मजबूत असते.

कार्तिक (ऑक्टोबर-नोव्हेंबर) - थंड पेये वापरणे थांबवा. ताक, लस्सी, थंड दही, थंड फळांचा रस इत्यादी सेवन करू नका, यामुळे तुमच्या आरोग्याला हानी पोहोचू शकते.

पौष (डिसेंबर-जानेवारी) - या ऋतूत दूध, पनीर, खवा, गोंद लाडू, गूळ, तीळ, तूप, बटाटा, आवळा इत्यादीपासून बनवलेले पदार्थ खावेत, या गोष्टी तुमच्या शरीराला स्निग्धता देतील. थंड अन्न, शिळे अन्न पचण्यास जड जाईल.

माघ (जानेवारी-फेब्रुवारी) - या महिन्यात गरम आणि जड अन्नही घेऊ शकता. तूप, नवीन धान्य, गोंड लाडू इत्यादींचा वापर करता येतो.

फाल्गुन (फेब्रुवारी-मार्च) - या महिन्यात गुळाचा वापर करा. सकाळी योगासने आणि आंघोळीचा नित्यक्रम करा. हरभरा वापरू नका.

# पोलादपुरात पेरा आणि नांगरणीला वेग

## मृग नक्षत्राच्या पंधरवड्यात सागोतीचा नैवेद्य देण्याची प्रथा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात रोहिणी नक्षत्रावर गेल्या गुरूवारपासून शेतकऱ्यांनी बियाणांचा पेरा करण्यास सुरुवात केली असून पेऱ्याच्या वाफ्याभोवतीच्या शेतात नांगरणीच्या कामाने वेग धरल्याचे सर्वत्र दिसत आहे. दरम्यान, कोकणात मृग नक्षत्राच्या पंधरवड्यात देवाला आणि शेताला पक्षी धरून राखण देण्याची प्रथा आजही जोपासली जात आहे.



पोलादपूर तालुक्यामध्ये अवकाळी पावसापाठोपाठ मान्सूनची सुरुवात झाल्याने पाऊस चांगलाच स्थिरावला आहे. शेतजमिनीमध्ये नांगरणी करून रोहिणी नक्षत्रावर गेल्या गुरूवारी पेरलेले भातबियाणे आता रूजून वाफा हिरवा होऊ लागला आहे. शेतकऱ्यांनी पेरणीसाठी जमिनीची मशागत करताना पेऱ्याच्या वाफ्याभोवतीच्या शेतजमिनीवर नांगरणी सुरू केली आहे.

कोकणात मृग नक्षत्राच्या पंधरवड्यात देवाला आणि शेताला पक्षी धरून राखण देण्याची प्रथा असून शुक्रवारी नक्षत्राचा प्रारंभ झाल्यानंतर रविवारी राखण देण्याच्या हेतूने चाकरमानी मंडळी पोलादपूर तालुक्यातील आपापल्या गावांमध्ये दाखल झाले होते, मात्र या दिवशी राखणीसाठी आरवते कोंबडे न मिळाल्याने चाकरमान्यांचा हिरमोड होऊन बुधवारपर्यंत मुक्काम लांबवावा लागला. चिकन सेंटरच्या दुकानांमध्ये कोंबडा मिळण्यासाठी अनेक चाकरमान्यांनी आगाऊ रक्कम देऊन आपापला पक्षी आरक्षित केले आहे. गावागावातील कोंबडे रविवारपासून महागले असून आरवणाऱ्या गावठी कोंबड्याची किंमत ७०० ते १२०० रूपयांपर्यंत पोहोचल्याने आत पोल्ट्रीतील बारामती आणि सुरती कोंबडादेखील चालवून घेणाऱ्या चाकरमान्यांना गावातील वृद्ध मंडळींनी कोंबडे पाळायला हवे असल्याचे देखील अनेकांनी सांगितले.

मृग नक्षत्रावर पावसाचा जोर रोज कायम असून वातावरणातील गारव्यावर शेताची राखण देऊन कोंबड्याची सागोती नैवेद्य म्हणून भक्षण करण्यासाठीचा इलाज बुधवारी तसेच येत्या शुक्रवार व रविवारी मोठ्या प्रमाणावर बिगरवारकरी शेतकरी मंडळींकडून केला जाणार आहे.

# पहिल्याच पावसात श्रीवर्धनमध्ये गटारातील कचरा रस्त्यावर

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहराला लागूनच असलेल्या आराठी ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छतेचे तीनतेरा वाजल्याचे पहायला मिळत आहे. मंगळवारी पहाटे श्रीवर्धन तालुक्यामध्ये मुसळधार पाऊस पडत होता. यामुळे गटारातील पाणी रस्त्यावर वाहू लागले व कचरा मेटकर्णी परिसरातील रस्त्यावर सर्वत्र पसरलेला पहायला मिळत होता. आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये डम्पिंग ग्राउंड अद्यापपर्यंत अस्तित्वात नाही, पण लोकसंख्या जास्त असल्यामुळे कचरा खूप मोठ्या प्रमाणात या ठिकाणी जमा होतो.

अनेक नागरिक श्रीवर्धन–दिघी रोडवर गोखले कॉलेजच्या समोर हा कचरा टाकताना दिसतात. त्या ठिकाणी मोठ मोठे कचऱ्याचे व प्लास्टिकचे ढीग जमलेले असतात. वास्तविक पावसाळा सुरू होण्याअगोदर मेटकर्णी परिसरातील गटारांमध्ये असलेला कचरा ग्रामपंचायतीने काढून गटारे स्वच्छ करणे गरजेचे होते, परंतु अशा प्रकारे कोणतीही कामे झाले नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.



# माथेरान जुम्मापट्टी येथे पर्यटकांच्या वाहनाला अपघात

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ–माथेरान घाटरस्त्यातील जुमापट्टी येथील येस टर्न अपघाताला आमंत्रण ठरत आहे. काही दिवसांपूर्वी याच वळणावर दुचाकीचा अपघात घडून एका तरुणाचा मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच सोमवारी (दि.१०) रात्रीच्या सुमारास उल्हासनगर येथून आलेल्या पर्यटकांच्या वाहनास अपघात घडला. सुदैवाने जीवितहानी झालेली नसली तरी वाहनाचे नुकसान झाले आहे.



उल्हासनगर येथील पर्यटक माथेरान फिरून झाल्यानंतर आपल्या ईर्टिगा कार (एमएच ०५ डीएच ४१२०) ने माथेरान घाटरस्ता उतरत होते. जुमापट्टी येथील येस टन या वळणावर आले असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार सुरक्षा कठड्याला धडकून समोरील झाडाला ठोकली. दैव बलवत्तर म्हणून जीवितहानी झालेली नाही, मात्र वाहनाचे नुकसान झाले.

# भुवनेश्वर पाणी योजनेला वनविभागाची परवानगी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वरसे हद्दीतील येथील भुवनेश्वर येथे २०२३ साली जलजीवन मिशन अंतर्गत सुमारे साडेतीन कोटी रुपयांची योजना चालू होती, परंतु वनविभागाच्या परवानगीची अडचण होती. ग्रामस्थांची पाण्यासाठी मागणी लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याची सुविधा होण्याकरिता सोमवारी (दि. १०) अखेर उपवनसंरक्षक अप्पासाहेब निकत यांनी परवानगी दिली आहे. त्याबद्दल वरसे ग्रामपंचायतीमध्ये मधुकर पाटील यांनी ग्रामस्थांच्या वतीने वनखात्याचे आभार मानले.

सुमारे साडेतीन कोटी रुपये खर्च करून जलजीवन पाणी योजनेमुळे नागरिकांची तहान भागणार



होती, मात्र वनखात्याने परवानगी नाकारल्याने पुढील काम रखडलेले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हर घर हर नल या योजनेसाठी गाव ठिकाणी वनखात्याने कोणतीही अडचण करू, नये असा नियम असताना भुवनेश्वर येथील योजनेत परवानगी नाकारण्यात वनखात्याला रस आहे का? असा सवाल राष्ट्रवादीचे मधुकर पाटील यांनी उपस्थित केला होता. जर दोन दिवसांत वनविभागाने योजनेला परवानगी दिली नाही तर महिलांचा हंडा मोर्चा वनविभागावर काढू, असा इशाराही त्यांनी देताच तत्काळ वनविभागाने परवानगी दिली. या परवानगीमुळे वरसे येथील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.

**भुवनेश्वर येथील जलजीवन मिशन योजनेत काही शासकीय अडचणी होत्या. त्यात लगेच लोकसभा निवडणूक लागल्याने आचारसंहिता लागू झाल्या होत्या, मात्र आता या योजनेला वनविभागाने परवानगी दिली आहे.**

**–अप्पासाहेब निकत, उपवनसंरक्षक, रोहा**

# आदर्श पतसंस्थेकडून रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांच्या ७२व्या वाढदिवसानिमित्त आदर्श भवन येथे शनिवारी (दि.८) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ५५ बाटल्या रक्तसंकलन करण्यात आले.

पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील, संचालक सतीश प्रधान, संचालक अनंत म्हात्रे, ॲड. वर्षा शेठ, विलाप सरतांडेल, जगदीश पाटील सुरेश गावंड, रामभाऊ गोरीवले, ॲड. रेश्मा पाटील, महेश चव्हाण, शाखा सल्लागार विजय पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील आदी उपस्थित होते.

याच दिवशी पतसंस्थेच्या चेंढरे शाखेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यानिमित्त सत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली होती.



# म्हसळा येथील सार्वजनिक वाचनालयात वृक्षालय

**म्हसळा : प्रतिनिधी**

पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण हा एकमेव पर्याय आहे. यासाठीच म्हसळा येथील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयातर्फे सोमवारी (दि.१०) वाचनालयाचे परिसरात वृक्षलागवड करण्यात आली. या वेळी शाळा, सामाजिक संस्थांसाठी ३०० विविध प्रजातींचे वृक्ष मोफत वाटण्याचा संकल्प करण्यात आले. ही वाचनालयाचे अध्यक्ष आणि संचालकाची कल्पना प्रचंड क्षमतावान असल्याचे प्रमुख अतिथी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र ढंगारे यांनी सांगितले.

या वेळी भारत मातेच्या प्रतिमेचे आणि विविध वृक्षांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वाचनालयाचे




अध्यक्ष संजय खांबेटे, खजिनदार सुनील उमरोटकर, संचालक रेखा धारीया, पांडुरंग पाटील माजी सभापती महादेव पाटील, कृषी पर्यवेक्षक तथा रॉयल क्लबचे सुजय कुसाळकर, सुशीलकुमार गाडगे, कृषी सहाय्यक व्हि. सी. सोनावणे, कल्पना शेळके, धनंजय सरनाईक, जि. पी. देवडे, परेश नाक्ती, एन. जी. जामकर, ग्रंथपाल उदय, सायली चोगले, प्राची मेदाडकर, चांगदेव सानप, वाचक उपस्थित होते.

पावसाळा चालू आहे. झाडे लावण्यासाठी आपली संस्था पुढाकार घेत असून संस्थेच्या माध्यमातून आवळा, जांभूळ, सीताफळ, करंज, सुरु, चिंच, बांबू, काजू यांसारखे देशी वृक्ष वाचनालयात उपलब्ध असून शहरातील शाळा, मंदिरे, स्मशानभूमी यांना वृक्षलागवडीसाठी मोफत देणार असल्याचे अध्यक्ष संजय खांबेटे यांनी सांगितले.

या वेळी कोळवटचे शेतकरी दयानंद शिंदे यांना काजू वृक्ष महादेव पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.

# ई–केवायसी न केलेल्यांसाठी विशेष मोहीम

**रायगड :** प्रधानमंत्री किसान योजनेसाठी नोंदणी करणे, ई–केवायसी करणे, बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता योजनेचा १७वा हप्ता वितरणापूर्वी स्वत: बँक खाती आधार संलग्न व ई–केवायसी न केलेल्या लाभार्थींनी १५ जूनपर्यंत आयोजित विशेष मोहिमेमध्ये करून घेण्याचे आवाहन शेतकऱ्यांना करण्यात येत आहे. या मोहिमेमध्ये लाभार्थींची स्वयंनोंदणी व ई–केवायसीसाठी राज्यातील सर्व सामाईक सुविधा केंद्र तर आधार संलग्न बँक खाती उघडण्यासाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँक यांनाही सहभागी करण्यात आले आहे.

# कर्जतमध्ये शिबिरात ७९ दात्यांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात ७९ दात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत खालापूर तालुक्यातील ४९५वे रक्तदान शिबिर ठरले.

शिबिराचे उद्घाटन राजिप माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अशोक भोपतराव, भगवान भोईर, एकनाथ धुळे, प्रकाश पालकर, ॲड. राजेंद्र निगुडकर, भगवान चंचे, संतोष बैलमारे, भानुदास पालकर, निखिल पालांडे, आर. के. कोळंबे, रमेश जाधव, तुकाराम साबळे, राजेश पारटे, ॲड. पूजा सुर्वे, ॲड. रंजना धुळे, ॲड. स्वप्नील पालकर, वैशाली जाधव, मधुरा चंदन, सुचिता लोहकरे, युक्ता भोपतराव आदी उपस्थित होते.

कोंदिवडे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद देशमुख यांनी सर्वप्रथम रक्तदान केले. रक्त संकलनाचे काम समर्पण रक्तपेढी घाटकोपर यांच्या डॉ. दिनेश सिंग, लता देशक, शीला वाघमारे, दिपेश सरदार, प्रदीप नितोरे, सागर कांबळे, राजेश सोळंकी आदींनी केले. उर्मिला देवकर, स्वेता आहिर, महादू जाधव, शरद मुंढे, अशोक जाधव, जनार्दन ऐनकर, सोमनाथ पालकर, अतुल कडु, संतोष थोरवे, विमल देशमुख, मनिषा देशमुख, केतन बेलोसे, महेंद्र घारे, प्रमोद पिंगळे, प्रवीण देशमुख, सुजित भोईर, मधुकर घारे, महेंद्र बेडेकर, गणेश ठोसर आदी उपस्थित होते.



# वाडगाव येथे महिला बचत गटाला साहित्याचे वाटप

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वाडगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वाडगाव येथे महिला बचत गटाला विविध साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये शिलाई मशीन, मसाला मशीन, दळण मशीन, पापड मशीन, शेगडी, सायकल, सतरंजी आदींचा समावेश होता. ग्रामपंचायतीच्या १५व्या वित्त आयोगातून आदिवासी युवकांना बेंजो साहित्याचे वाटप करण्यात आले. उपसरपंच जयेंद्र भगत यांच्या विशेष प्रयत्नातून हे साहित्य उपलब्ध करण्यात आले.



या वेळी सरपंच सारिका पवार, सदस्या निलम थळे, शुभांगी भगत, रूपाली पाटील, सजणा नाईक, संतोष बोले तसेच माजी सरपंच सिताराम भगत, सरिता भगत, किरण लाखण, रमेश भगत, गोपिनाथ भगत, भास्कर भगत, गणपत पवार, मधुकर थळे, प्रसाद पाटील,नरेश थळे, नथुराम म्हात्रे, सुहास धावडे, हेमंत लाखण, कमळाकर धनावडे, सुनील मोहिते, नथुराम कावजी, सुरेश भगत, ग्रामस्थांसह जयेंद्र भगत यांच्या मातोश्री इंदिरा भगत यांची उपस्थिती विशेष होती.

राजिप महिला बालकल्याण विभागाचे महिला १० महिला बचत गटांना शिलाई मशीन, राजिप महिला बालकल्याण विभागाचे २२ सायकल, ३० बचत गटांना सतरंजी, राजिप महिला बालकल्याण विभागाचे पाच गॅस शेगडी, तसेच राजिप महिला बालकल्याण विभागाकडून तीन मसाला मशीन, दोन दळण मशीन, एक पापड मशीन व वाडगाव ग्रामपंचायत १५ टक्के अनुदानातून आदिवासी युवकांना बेंजो साहित्य देण्यात आले.

# जिल्हा कारागृहातील कैद्यांची आरोग्य तपासणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कारागृहातील कैद्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन शनिवारी कारागृहात करण्यात आले. १८१ कैद्यांची तपासणी करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये १२ महिला कैद्यांचा समावेश होता. जिल्हा कारागृह आणि अलिबागमधील सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

शिबिरामध्ये कामोठे येथील एमजीएम रुग्णालय, डॉ. जी. डी. पोळ फाऊंडेशन, वाय. एम. टी आयुर्वेदीक मेडिकल कॉलेज खारघर, वाय. एम. टी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल खारघर, वाय. एम.टी. दंतवैद्य हॉस्पिटल खारघर, लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल, पटवर्धन हॉस्पिटल पनवेल या नामंकित वैद्यकिय संस्थांमधील तज्ज्ञांनी कैद्यांची सर्वसाधारण आजार, नेत्र, नाक, कान, त्वचारोग, दंत चिकित्सा तसेच महिला कैद्याची स्त्रीरोगविषयक वैद्यकीय तपासणी केली.



राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

पाहिजेत
ऑफसेट प्रिंटर ऑपरेटर पाहीजे
पत्ता: उसर्ली, घरकुल कॉलनी, पनवेल
संपर्क : ८७७९५९५५४५

MAHAVITARAN
TENDER NOTICE

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | BILLING/EE/ GOREGAON/ MHD/T-05 /2024 | Monthly Meter Reading of LT consumers up to 20kW (Excluding AG consumers other than Ag metered UrbanLT consumers coming under Municipal Corporation , Municipal Council , Nagar Parishad and Nagar Panchayat.)under **Mahad sub** division to be done using Mahavitaran Mobile App, IR/RF HHUs,Bill Printing and Bill distribution upto consumer /consumer premises for three financial years. | 219 | 73150/- | 5000+18 %GST =5900/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Mahadiscom website from Dt. 12.06.2024 to Dt. 27.06.2024. Similarly Submission of Bid is up to Dt. 27.06.2024 till 15.00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl.Executive Engineer, Tel No. 9029102659 M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**Executive Engineer Goregaon Division**

# नवी मुंबईत रस्ते खोदकामाची डोकेदुखी

## डेडलाईन संपली तरीही काँक्रिटीकरण सुरूच

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सार्वजनिक ठिकाणी चालू असलेली कामे १० जून पूर्वी पूर्ण करण्यात यावीत अशा सूचना नवी मुंबई मनपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केल्या होत्या, मात्र संबंधित ठेकेदाराकडून शहरातील विविध ठिकाणच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाची कामे सुरू असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

नवी मुंबईमधील सानपाडा रेल्वे स्थानकाच्या बाजूला आजमितीला काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. नवी मुंबई पालिका आयुक्तांनी १० जूनपर्यंत रस्त्याची खोदकाम, आणि इतर कामे करण्याची डेडलाईन दिली होती, मात्र अद्याप कामे पूर्ण झालेली दिसत नाही. सानपाडा रेल्वे स्थानकाच्या समोरील रस्ता हा सुस्थितीत असूनदेखील खोदकाम केलेले आहे. त्यामुळे पालिका जनतेचे पैसे लुटत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नवी मुंबई शहरातील बेलापूर ते ऐरोलीपर्यंतच्या रस्त्याची खोदकामे सुरू आहेत. मे महिन्यामध्ये ही खोदकामे सुरू करण्यात आली आणि ती पूर्ण करण्याची डेडलाईन ही १० जून देण्यात आली होती, मात्र अद्यापही कामे अनेक ठिकाणी सुरूच असलेली पाहायला मिळतात. वाशी, सानपाडा रेल्वे स्टेशन, ऐरोली, महापे, जुईनगर अशा अनेक ठिकाणी कामे अजूनही सुरू आहेत. या वर्षी नवी मुंबई महापालिकेने २०० कोटी रुपयांची खोदकामे काढली होती. या कामांसाठी वीस ठेकेदार नेमले, मात्र या ठेकेदारांनी पालिकेने दिलेली डेडलाईन न पाळल्याचे पहायला मिळते आहे. अनेक ठिकाणी चाललेल्या या खोदकामामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याची खोदकामे नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.



चांगले रस्ते असूनही पालिकेने का खोदले असा देखील नागरिकांना प्रश्न पडत आहे. शहरातील रस्त्यांची कामे ही सहा वर्षातून एकदा निघतात आणि या कामाची तीन वर्षे देखभाल आणि दुरुस्ती करण्याची ठेकेदारांची जबाबदारी असते, असे असले तरी रस्त्यावर क्रॅश गेले किंवा कुठे खड्डे पडले, अशा वेगवेगळ्या कारणांमुळे या रस्त्यांची कामे काढली जात असल्याचे पालिकेचे म्हणणे आहे.

**नवी मुंबई शहरातील रस्ते जास्त खराब होऊन नंतर कामे काढण्यापेक्षा थोड्याफार प्रमाणात झालेल्या खराब रस्त्यांचे काम काढले जाते हे योग्य नाही. नवी मुंबई शहरातील अनेक कामे पावसाळा सुरू झाला तरी सुरूच आहे. त्यात पामबीचसारख्या चकचकीत रस्त्यांवरदेखील खोदकाम केले आहेत. त्यामुळे या सुरू असलेल्या खोदकामांवर कोण आवाज उठवणार नवी मुंबई महापालिका ही जनतेचे पैसे लुटत आहे.**
**–आबा रणवरे, नागरिक**

**नवी मुंबई महापालिकेच्या अभियंता विभागाने अत्यावशक असलेली कामे सुरू केली होती. बहुतांशी कामे पूर्ण झाली आहेत. काही सुरू असलेली कामे एक दोन दिवसांत पूर्ण केली जातील.**
**–शिरीष आरदवाड, मुख्य शहर अभियंता, नवी मुंबई मनपा**

# होर्डिंगमुळे शहराचे विद्रूपीकरण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या उदासीनतेमुळे शहरात अनधिकृत होर्डिंगचे पेव फुटले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या विजयी उमेदवारांच्या जाहिराती शहरात मोठ्या प्रमाणात विनापरवानगीने लावण्यात आल्या आहेत. यामुळे शहरात विद्रूपीकरण झाले आहे.

नवी मुंबई महापालिकेचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. असे असतानाही महापालिका प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी नागरिक करीत आहेत. नवी मुंबई महापालिकेचे मुख्यालय असलेल्या किल्ले गावठाण चौकातही विविध नेत्यांचे वाढदिवसाचे, तसेच जाहिरात फलक लागलेले दिसून येतात.

सीबीडी बेलापूर येथील कोकण भवन चौक, पोलीस आयुक्तालयकडे जाणारा चौक, दिवाळी गाव, अग्रोली गाव, नेरूळ अक्षर चौक, गायमुख चौक, सारसोळे बस डेपो, समाधान चौक, एलपी चौक, राजीव गांधी उड्डाणपूल चौक, तुर्भे नाका, तुर्भे स्टोअर, आय सी एल शाळा चौक, अरेंजा सर्कल, कोपरखैरणे डी मार्ट, ऐरोली सेक्टर ५ चौक, घणसोली या ठिकाणी अनधिकृत होर्डिंग लागलेले असतात.

सर्वत्र अनधिकृत होर्डिंग राजरसपणे कोणतीही अनुमती न घेता लावलेले असतात. नोकऱ्या विषयी जाहिरातीचे पोस्टर, वाणिज्य आस्थापने हे त्यांच्या उत्पादनाची जाहिरातबाजी करताना दिसतात.

या प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून संबंधितांवर गुन्हे नोंद केल्यास याला आळा बसू शकेल. तसेच संबंधित विभाग कार्यालयातील वरिष्ठ लिपिक किंवा अधीक्षक यांनी यावर गुन्हे नोंद करण्याची किंवा दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे. असे असतानाही अतिक्रमण विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करताना दिसतात, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

या प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्यामुळे आयुक्त कैलास शिंदे यांनी सर्व संबंधितांवरती कारणे दाखवा नोटीस बजावून कारवाई करावी, अशी मागणी सर्वसामान्य करदाते करत आहेत.

# बेलापुरात बेकायदा बांधकाम तोडले

**नवी मुंबई :** महापालिका कार्यक्षेत्रातील ए विभाग कार्यालयांतर्गत बेलापूर, सेक्टर १९ या ठिकाणच्या दोन घरांमध्ये केलेले बांधकाम पुनश्च हटविण्यात आले.

आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आदेशान्वये व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनानुसार ए विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त शशिकांत तांडेल, यांच्या नियंत्रणाखाली बांधकाम पुनश्च हटविण्यात आले. या धडक मोहिमेसाठी उप अभियंता (प्रभारी) रोहित ठाकरे, कनिष्ठ अभियंता मयुरेश पवार, वरीष्ठ लिपिक स्वप्निल तारमळे आदी उपस्थित होते.

# नवीन पनवेलमध्ये वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने नवीन पनवेल सेक्टर ०६ येथील जीसी अस्पिरा २०६ सोसायटीचा व्यवस्थापन समिती मार्फत वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी कडुलिंब, उंबर, वड, जांभूळ, बकुळी, आंबा, गुलमोहर, अशोक, अशा विविध प्रकारच्या १०० हूनअधिक वृक्षांची रोपण करण्यात आले असून या वृक्षांच्या संवर्धनाची कायम स्वरूपी जबाबदारी ही सोसायटीतील सदस्यांनी घेतली आहे.

या कार्यक्रमासाठी सोसायटीचे अध्यक्ष बळीराम शिवाजी साबळे, सचिव विशाल टोपकर, डी. के. सिंग, प्रशांत खांडवे, विशाल वटकर, अरविंद गायकवाड, मिलिंद खंदारे, नरेश मोकर व इतर सोसायटीत सदस्य हजर होते. या उपक्रमामध्ये हजर सोसायटीचे सर्व सदस्यांचे सोसायटीच्या अध्यक्षांच्या वतीने अभिनंदन आणि धन्यवाद मानले केले.

# कोकण रेल्वेच्या तीन गाड्या दादरपर्यंत धावणार

**नवी मुंबई : बातमीदार**

मध्य रेल्वेने मुंबई सीएसएमटी स्थानकातील फलाटांच्या विस्तारीकरणाचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे ७ जुलैपर्यंत कोकण रेल्वेच्या तीन गाड्यांचा प्रवास दादर स्थानकापर्यंतच सीमित राहणार आहे. मध्य रेल्वेच्या सूचनेनुसार हा निर्णय घेतल्याचे कोकण रेल्वेने स्पष्ट केले आहे.

मध्य रेल्वेने सीएसएमटी स्थानकातील फलाट क्रमांक १०, ११, १२ आणि १३ च्या विस्तारीकरणाचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे कोकण रेल्वेच्या लांब पल्ल्याच्या तीन गाड्यांच्या वेळापत्रकात ७ जुलैपर्यंत बदल केला आहे. त्यानुसार या कालावधीत मंगलुरू जंक्शन–मुंबई सीएसएमटी (१२१३४) एक्स्प्रेसचा प्रवास दादर स्थानकात स्थगित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे मडगाव जंक्शन – मुंबई सीएसएमटी (०२१२०) तेजस एक्स्प्रेस आणि मडगाव जंक्शन – मुंबई सीएसएमटी (१२०५२) या जनशताब्दी एक्स्प्रेसचा प्रवाससुद्धा ७ जुलैपर्यंत दादर स्थानकात स्थगित केला जाणार असल्याचे कोकण रेल्वेने स्पष्ट केले आहे.

# मोहोपाड्यात बचत गट आणि महिला गृह उद्योगांचे प्रदर्शन, विक्री मेळावा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्या वतीने स्थानिक महिला बचतगट आणि महिला गृह उद्योग यांच्या व्यवसायाला प्रोत्साहन आणि विक्री देण्यासाठी ८ आणि ९ जून २०२४ रोजी जनता विद्यालय मोहोपाडा येथे दोन दिवसांसाठी प्रदर्शन आणि विक्री मेळावाचे आयोजन केले होते.

दोन्ही दिवशी प्रदर्शनाला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिला गृहउद्योगाला प्रोत्साहन आणि व्यवसाय देण्यासाठी रसायनिकरानी मेळाव्याला भरभरून भेट दिल्या आणि सर्व स्टॉल मालकांना त्यांची उत्पादने खरेदी करून पाठिंबा दिला. मेळाव्याला ग्रुप ग्रामपंचायत वासंबेचे सरपंच उमा मुंढे, माजी सरपंच निलम पाटील व इतर ग्रामोन्नचायतचे सदस्य महिलांचा स्टॉलला भेट देऊन त्यांना प्रोत्साहन दिले. मेळावाचे समारोप रोटरीचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण होणावले आणि अध्यक्ष रेश्मा कुरूप यांनी केले.

रोटरी सदस्य अमित शाह, शारदा काळे, सुनील कुरूप, सुशांत उचिल, होणावले सर, अनुराधा होणावले सिस्टर ह्यांची मोलाची साथ होती. सगळ्या स्टॉल धारक मेळाव्यात विक्री झाल्याबद्दल समाधान आणि आनंद व्यक्त केले आणि रोटरी क्लबचे आभार व्यक्त केले.





**उरण : पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन व्हावे यासाठी चिरनेर गावातील नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. जवळजवळ ७० ते ८० टक्के चिखल, माती व प्लास्टिक कचऱ्याचा गाळ तसेच नाल्यात वाढलेली झुडपे जेसीबीच्या साह्याने साफ करण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. त्यामुळे येथील नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.**

# पनवेल महापालिकेकडून विविध कामांचा आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या आयुक्तपदाची सुत्रे मंगेश चितळे यांनी चार दिवसांपूर्वी हाती घेतल्यानंतर कामाच्या नियोजनाच्या बैठकांचे सत्र महापालिकेत सुरू आहे. यामध्ये पावसाळ्यापूर्वी कामाचा आढावा, महावितरण, आयआरबी, सार्वजनिक बांधकाम विभाग अशा विविध प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांसोबत, तसेच भविष्यातील विकासाची घडी बसविण्यासाठी महापालिका प्रशासनाने हाती घेतलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी बैठकांचे सत्र पालिकेत सध्या जोरदार सुरू आहे.



आयुक्त चितळे यांना पनवेल शहरातील पिण्याच्या पाण्यासारखा आणि इतर पायाभूत सुविधांचे प्रश्न मार्गी लावण्यासोबत पालिकेची सुरु असलेली विकासकामे वेगाने कशी करता येतील असे आव्हान आयुक्त चितळे यांच्यासमोर आहे. शनिवार हा सुट्टीचा दिवस असला तरी आयुक्त चितळे यांनी पालिका उपायुक्त आणि अभियंत्यांसोबत पावसाळ्यापूर्वी सुरु असलेल्या नालेसफाईची पाहणी दौरा केला. स्थानिक अधिकाऱ्यांना न सांगता हा दौरा अचानक पालिका क्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये घेण्यात आला. तसेच अतिवृष्टीत आपत्ती ओढावू नये यासाठी पावसाळ्या पूर्वी केलेल्या कामांच्या आणि आपत्ती व्यवस्थापनाचा आढाव्यासाठी पालिकेचा पदभार घेतलेल्या दिवशीच बैठक बोलावण्यात आली.

या बैठकीमध्ये पालिका क्षेत्रात रायगड जिल्हापरिषदेच्या शाळांच्या २९ शाळा अतिधोकादायक तर २७ शाळा तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने शाळा सुरू होण्यापूर्वी अतिधोकादायक शाळेच्या इमारतीचे पाडकाम करून इमारतीची दुरुस्ती सुचविलेल्या शाळांची किरकोळ दुरूस्ती तातडीने करण्याची सूचना पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांना आयुक्तांनी दिली.

जुन्या मुंबई पुणे महामार्गावरील ओ.एन.जी.सी. पुलाखाली पाणी साचण्याची दरवर्षीची समस्या आहे. तेथे पाणी निचरा होण्यासाठी पालिकेने व इतर प्रशासकीय विभागांसोबत समन्वय साधून उपाययोजना करण्याचे आदेश आयुक्त चितळे यांनी दिले. याच मार्गिकेवर वेलकम हॉटेल येथे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबुन राहत असल्याने एम.एस.आर.डी.सी. लासुद्धा लेखीपत्र देऊन कळविण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. दुसऱ्या दिवशी आपत्ती व्यवस्थापनाच्या आढावा बैठकीत पालिका हद्दीतील ७९ धोकादायक इमारती असून यापैकी ४० इमारती रिक्त करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून आयुक्तांना देण्यात आली.

सध्या यापैकी २ इमारतींवर महापालिकेच्या वतीने पाडकाम सुरू असून उर्वरित इमारतींमधील पाणी व वीज पुरवठा बंद करून लवकरात लवकर या इमारती रिकाम्या करून त्यांच्यावरती कारवाई करण्याचे पालिकेचे नियोजन असल्याची माहिती या बैठकीत अधिकाऱ्यांनी आयुक्तांना दिली.

यासोबतच शहरामध्ये ३३ अनधिकृत फलक असून यापैकी २१ अनधिकृत फलकांवर पालिकेने कारवाई केली आहे. पालिकेच्या अधिकाऱ्यांनी उर्वरीत १२ फलकांचे तातडीने सर्वेक्षण करून अत्यंत धोकादायक फलक पाडावेत, अशा सूचना आयुक्त चितळे यांनी दिल्या.

# आकर्षक छत्र्या, रेनकोट बाजारात दाखल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होताच बाजारात शालेय साहित्यासह विविध रंगीबेरंगी छत्र्या, रेनकोट या पावसाळी वस्तूंनी बाजारपेठेतील दुकाने गजबजली असून याच्या खरेदीसाठी लगबग सुरू झाली असल्याचे पहाव्यास मिळत आहे.

लहान मुलांच्या रेनकोटमध्ये कार्टूनची प्रिंट असलेल्या रेनकोटला मागणी अधिक आहे. मुलींमध्ये वनपीस, टूपीस आणि पोन्चोलाही मागणी आहे. खरेदीदारांमध्ये ब्रँडेड रेनकोटला सर्वाधिक मागणी आहे. दरानुसार दर्जा असल्याने मध्यम आणि किमान एक पावसाळी हंगाम जाईल, असा रेनकोट खरेदी करण्याकडे लोकांचा अधिक कल आहे.

तरुणांसाठी पॅन्ट-शर्ट, तर लहानग्यांमध्ये कार्टून, स्पायडरमॅनच्या चित्रांना मागणी अधिक आहे. याशिवाय पावसाळी सँडल, बुट्स, चप्पला देखील खरेदी केल्या जात आहेत. पावसाळी चप्पल, सॅन्डल व बुटांच्या किमती या ब्रँडनुसार आकारल्या जातात.



नियमित एक घडी असणाऱ्या काळ्या रंगाचे कापड असलेल्या छत्र्यांसोबत आता छत्रीवर पाणी पडताच त्यावरील प्रिंट केलेली पाना फुलांसह कार्टून चित्रांचा रंग बदलणाऱ्या छत्र्यांना मागणी आहे. तरुणांमध्ये हार्ट शेप, विंडो, स्क्वेअर, टू फोल्ड, थ्री फोल्ड, फाइव्ह फोल्ड, टो ओपन, क्लोज, वुईथ टार्च, तर महिलांमध्ये सहजरीत्या पर्समध्ये बसतील अशा छत्र्याही बाजारात आहेत.

### चौकोनी आकाराच्या छत्र्या

यंदा चौकोनी आकाराच्या छत्र्या बाजारात आल्या असून एका छत्रीत दोघे जण आरामात पावसा पासून बचावं करू शकतात. काही छत्र्यांवर कवितेच्या ओळी लिहिलेल्या तर काहींवर अक्षराची कमाल देखील पाहायला मिळत आहे.

### पोन्चू रेनकोटला मागणी

खिशाला परवडणारा पोन्चोस रेनकोटमध्ये शर्ट–पॅन्ट रेनकोटसह वनपीस आणि कुठेही कसाही वापरता येणारा पोन्चू रेनकोटला सर्वाधिक मागणी आहे. एकदाच वापरायचा आणि फेकून द्यायचा असाही रेनकोट अगदी १०० रुपयात बाजारात उपलब्ध आहे.

# आनंदयात्री मी काव्यसंग्रहाचे मॉरिशसमध्ये प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई सानपाडा येथील मिलेनियम टॉवरमध्ये राहणाऱ्या व महिला मंडळ बाल विकास केंद्र प्राथमिक शाळा, कुर्ला येथे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या व कवयित्री अनिता मेस्त्री यांच्या आनंदयात्री मी या काव्यसंग्रहाचे प्रकाशन मॉरिशस येथे झाले.



महात्मा गांधी इन्स्टिट्यूट स्कूल ऑफ इंडियन स्टडीज, डिपार्टमेंट ऑफ मराठी स्टडीजच्या सहकार्याने स्नेहल आर्ट्स अँड एज्युकेशन सोसायटी महाराष्ट्र, अक्षर विश्व मराठी साहित्य संमेलन सब्रमणिय भारती लेक्चर थिएटर, महात्मा गांधी इन्स्टिट्यूट मोका, मॉरिशस येथे झाले.

या संमेलनात मराठी गझल कार्यक्रम, काव्यगायन सादरीकरण झाले. संमेलनात मॉरिशसच्या मराठी अभ्यास विभाग प्रमुख डॉ. मधुमती कुंजुल, सी.एस.के. महासंचालक रामपरताब, नितीन बापू , एम. के. गोंधळी, डॉ. दिलीप पांढरपट्टे व कल्पना गवरे तसेच अजमेर लेखिका मंच अवाम सामाजिक सेवा संस्था या सर्वांच्या उपस्थितीत भारताच्या मुंबईतील कवयित्री अनिता मेस्त्री यांच्या आनंदयात्री मी या पहिल्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन पार पडले. याच काव्यसंग्रहातील हेचि दान या कवितेचे सादरीकरणही त्यांनी केले.

रामचंद्र मेस्त्री व अनिता मेस्त्री यांना सन्मानचिन्हं देऊन सन्मानित करण्यात आले. आपला पहिला काव्यसंग्रह आनंदयात्री मी मॉरिशस येथे प्रकाशित झाला याचा आनंद निश्चितच अवर्णनीय आहे, असे मनोगत उभयतांनी व्यक्त केले.

## निवडक

### मराठा समाज अध्यक्षपदी पांडुरंग शिंदे



**पेण** : तालुका मराठा समाजाच्या अध्यक्षपदी पांडुरंग तुकाराम शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पेण तालुका मराठा समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यामध्ये प्रदीप चव्हाण यांच्या निधनानंतर रिक्त असलेल्या अध्यक्षपदी पांडुरंग शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या वेळी भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, चिंतामण महाडिक, भाऊ एरणकर, बापु दळवी, आण्णा पार्टे, राजेंद्र वारकर, प्रकाश झावरे, शंकर मानकवळे, रघुनाथ बोरेकर, मंगेश दळवी, शिवाजी पाटील, शिरीष मानकवळे, महिला अध्यक्षा सुगंधा गोडीवले, शहराध्यक्ष प्रवीण बैकर, विशाल साजेकर, कमलाकर साळुंके, सचिन पवार, श्रीकांत जाधव, मनीष देशमुख, संतोष जाधव उपस्थित होते.

### खालापुरात न्यायाधिशांची नियुक्ती



**खोपोली** : खालापूर न्यायालयातील न्यायाधिश आर. डी. वाबले, न्यायाधिश पी. एम. माने, न्यायाधिश एल. के. सकपाळ यांची बदली झाल्याने खालापूर न्यायालयात न्यायाधीश म्हणून आर. वाय. खंदारे, सहन्यायाधिश एस. एस. देशमुख, सहन्यायाधिश डी. एस. खोत यांची नेमणूक करण्यात आली. खालापूर न्यायालयात सर्व वकिल वर्गाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. तिन्ही न्यायाधिशांनी सोमवारी (दि.१०) त्यांनी पदभार स्विकारला. या वेळी खालापूर बार असोशिएशन अध्यक्ष ॲड. सचिन चाळके, ॲड. सागर चोगले, ॲड. अनिता पवार यांचे हस्ते स्वागत करण्यात आले असून तिन्ही न्यायाधिशांनी आपला परिचय करून दिला, तसेच उपस्थित असलेल्या वकील वर्गाने न्यायाधिशांना आपला परिचय करून दिला.

### जय भवानी मंडळातर्फे वृक्षारोपण



**चौक** : पर्यावरण आणि निसर्गाचा समतोल राखण्यासाठी जय भवानी तरूण विकास मंडळातर्फे वृक्षलागवड करण्यात आली. यावर्षी प्रत्येकाने तापमान वाढ अनुभवली, अनेकांना त्याचा त्रास झाला. आपण सर्वांनी जागरूक राहून झाडे लागवड संवर्धन प्रोत्साहन देण्याची गरज आहे. त्यामुळे सार्वजनिक जागा, मोकळी जागा, शासकीय जागा, नदी नाले, तलाव यांच्या बांधावर वृक्ष लागवड करण्याचे निश्चित करून प्रत्येकाने झाडे दत्तक घेतली. सध्या सुरू असलेल्या पर्यावरणीय समस्यांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी आम्ही काम सुरू केले आहे, असे जय भवानी तरूण विकास मंडळाच्या सभासदांनी सांगितले.

# नडगाव संगम परिसरात मृत माशांचा खच

## ◆ पावसाचा फायदा घेत केमिकलमिश्रीत पाणी थेट नदीत ◆ स्थानिकांकडून कारवाईची मागणी

**महाड : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होऊन काही दिवसच झाले असताना महाड औद्योगिक परिसरातील गटारे रंगीत पाण्याने रंगली आहेत. नडगाव गावाजवळील संगमावर या प्रदूषित पाण्यामुळे मृत माशांचा खच पडलेला निदर्शनास आला आहे. प्रदूषण रोखण्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ असमर्थ ठरत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.



दोन दिवसांपूर्वी पडलेल्या पावसाचा फायदा कोणत्यातरी कंपनीने घेतल्याने रसायनमिश्रित सांडपाणी नदीमध्ये गेले. यामुळे नडगाव गावाजवळील संगमाजवळ नदीतील मासे मोठ्या प्रमाणावर मृत झाले, तसेच परिसरात दुर्गंधी पसरल्याने नागरिकांनादेखील त्याचा त्रास होत आहे. पाऊस पडल्याने हे पाणी थेट नदीला जाऊन मिळत आहे. महाड एमआयडीसीमधील टेमघर नाला, जिते गावाजवळील नाला आणि इतर औद्योगिक क्षेत्रातील नाले या प्रदूषित पाण्यामुळे रंगून गेले आहेत. या नाल्यामधील पाणी काळ आणि सावित्री नदीला जाऊन मिळत आहे. याबाबत अनेक वेळा तक्रारी होऊन देखील अद्याप बदल झालेला नाही. अधिवेशन काळातदेखील इतर भागातील आमदारांनी महाडच्या प्रदूषणाबाबत आवाज उठवला, मात्र याबाबतदेखील ठोस कारवाई झालेली नाही. महाड एमआयडीसी क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या भंगार व्यावसायिकांकडूनदेखील मोठ्या प्रमाणात सांडपाणी तसेच वाया जाणारे रसायन उचलले जाते. हे रसायनमिश्रित पाणी नाल्यामध्ये जाते. याबाबत कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालयाकडून केवळ नोटिसा बजावण्याचे काम केले जात आहे.

रासायनिक सांडपाण्यामुळे काळ आणि सावित्री नदीतील जलचरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या जलचरांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या कंपन्यांविरोधात कठोर कारवाई केली जावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

> **महाड एमआयडीसीमधील कंपन्यांकडून रासायनिक सांडपाणी पावसाचा फायदा उठवत नदीत सोडले जाते. यामुळे नदीमधील जलचर धोक्यात आले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून नदीत मासे मृत माशांचा खच पडला आहे. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे.**
>
> **–इफ्तिकार काळसेकर, ग्रामस्थ**

## मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवर टेम्पोची अज्ञात वाहनाला धडक; चालक गंभीर जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवर मंगळवारी (दि.११) पहाटे एका टेम्पोने समोरील अज्ञात वाहनाला जोरदार धडक दिल्याने केबिनमध्ये चालक अडकून गंभीर जखमी झाला आहे.



मुंबई–पुणे एक्स्प्रेसवेवरून पुण्याहून मुंबईकडे टेम्पो (डीडी ०१ – ९८७९) हा माल घेऊन पुण्याकडे जात असताना तो बोरघाटात आला असता, त्याचे टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील अज्ञात वाहनाला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात टेम्पोच्या केबिनमध्ये अडकून चालक गोविंद कुमार (वय ३५, रा. राजपूर, उत्तर प्रदेश) याच्या पायाला गंभीर दुखापत होऊन जखमी झाला असून त्याला तत्काळ बाहेर काढून पुढील उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

या अपघाताची माहिती मिळताच आयआरबी, देवदूत यंत्रणा, महामार्ग वाहतूक पोलीस, बोरघाट पोलीस, खोपोली पोलीस, डेल्टा फोर्स, अपघातग्रस्त टीमचे सदस्य तत्काळ घटनास्थळी दाखल होत टेम्पोमध्ये अडकेलेल्या चालकाला बाहेर काढण्यात आले असून त्यात रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## केळवलीतील रस्त्याचे नूतनीकरण

### भाजपचे किरण ठाकरे यांच्या पाठपुराव्याला यश

**खोपोली : प्रतिनिधी**

भाजपचे कर्जत–खालापूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांच्या पाठपुराव्यातून खालापुरातील केळवली श्री भैरवनाथ मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाकरीता निधी उपलब्ध झाला. त्यामुळे या रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. केळवली ग्रामस्थांनी याबाबत किरण ठाकरे यांचे आभार मानले आहेत.

कर्जत–खालापूर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी सर्वच राजकीय पक्षांतील नेते मंडळी आपआपल्या परीने पाठपुरावा करीत आहेत. भाजपचे विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख किरण ठाकरे यांनी केळवली श्री भैरवनाथ मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाकरीता सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली या रस्त्याच्या नूतनीकरणाकरीता २५/१५ योजनेतून आठ लाखांचा निधी उपलब्ध झाला. आता या रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.



> **आमच्या केळवली गावातील ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे नुतनीकरण व्हावे यासाठी भाजप युवा मोर्चा उपजिल्हाध्यक्ष जगदीश आगिवले यांच्या माध्यमातून विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांच्याकडे मागणी केली. त्यांच्या पाठपुराव्याने रस्ता कॉंक्रीटचा झाल्याने त्यांचे मनापासून आभार!**
>
> **–जयेश कर्णूक, भाजप केळवली बूथप्रमुख**

## मुरूड शहरासह तालुक्यात पावसाची हजेरी

### ● १५४ मिमी पर्जन्यवृष्टीची नोंद; वीजपुरवठा खंडित

**मुरूड : प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षा करायला लावणाऱ्या पावसाने अखेर मुरूडमध्ये हजेरी लावली आहे. सोमवारी रात्रीपासून शहरात विजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत असून १५४ मिमी नोंद झाल्याची माहिती नायब तहसीलदार राजेश्री साळवी यांनी दिली.

मुरूडकरांना उकाड्यातून दिलासा मिळाला आहे, तर शेतकरीही सुखावला आहे. हा पाऊस सतत पडत राहिला तर लवकरच पेरणीला सुरुवात होईल. भागात पावसाने हजेरी लावल्यामुळे तीव्र पाणीटंचाईची समस्या सुटण्यास मदत होणार आहे, असे असले तरी पावसाचे आगमन होताच विजेचा खेळखंडोबो सुरू झाला आहे. सोमवारपासून १५ तास वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिक हैराण झाले आहेत. दर अर्ध्या तासाने वीज खंडित होत असल्यामुळे विजेच्या उपकरणांवर परिणाम होऊन आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे महावितरणने कारभार सुधारावा, अशी येथील जनता मागणी करीत आहे.

## मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्याने खोपोलीत जल्लोष

**खोपोली : प्रतिनिधी**

भारताच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा विराजमान झाले आहेत. या पार्श्वभूमीवर देशभर जनता जल्लोष साजरा करीत आहेत. खोपोलीतही भाजप कार्यकर्त्यांनी ढोलताशांच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजी करीत गुलाल उधळला. नागरिकांना मिठाई वाटून आनंद साजरा केला. यानिमित्ताने दीपक चौकातील भाजप शहर मध्यवर्ती कार्यालयासमोर मोठ्या पडद्यावर शपथविधी सोहळा पाहण्यासाठी आयोजन केले.

भाजपच्या वतीने यानिमित्ताने सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार घालून महापुरुषांच्या जयजयकाराच्या घोषणा दिल्या. त्यानंतर सायंकाळी भाजप कार्यालयासमोर ढोलताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी व भाजपच्या जयजयकाराच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. या वेळी महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, खोपोली शहराध्यक्ष रमेश रेठरेकर, शहर सरचिटणीस राहुल जाधव, अजय इंगुलकर, उपाध्यक्ष दिलीप पवार, संजय कचरे, विकास खुरपुडे, देवेंद्र पाटील, चिटणीस विनायक माडपे, सुनील नांदे, हिम्मतराव मोरे, जैन प्रकोष्ट कीर्ती ओसवाल, महिला आघाडीच्या शहर सरचिटणीस सुप्रिया नांदे, महिला आघाडीच्या सुमिती महर्षी, गीता मोहिते, सीमा मोगरे, अपर्णा साठे, विभा पाठक, भारती शहा, ज्येष्ठ कार्यकर्ते वामन दिघे आदींसह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



## चौकचा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी भाजपचे महावितरणला निवेदन

**चौक : प्रतिनिधी**

चौक शहर व त्या परिसरातील विद्युत पुरवठा दिवसभरात चार ते पाच वेळा खंडित होत असल्याने परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे विद्युत पुरवठा सुरळीत सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा चौक शहर भाजप यांच्या वतीने देण्यात आला आहे.

चौक बाजारपेठ ही परिसरातील मोठी व ऐतिहासिक बाजारपेठ आहे. चौक शहराला होणारा विद्युत पुरवठा गेले काही दिवस दिवसातून चार ते पाच वेळा खंडित होत असल्याने असंतोष पसरला आहे. दिवसभरात लाईट नसल्याने गृहिणींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. व्यापाऱ्यांचेही नुकसान होत आहे. सध्या शाळा, कॉलेजचे प्रवेश सुरू झाल्याने मूळ दाखल्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थी व शासकीय कर्मचारी हैराण झाले आहेत. ही बाब विद्युत मंडळाच्या लक्षात आणून दिली तरी त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने चौक शहर भाजप अध्यक्ष व माजी उपसरपंच गणेश कदम यांनी मंगळवारी (दि.११) विद्युत मंडळ अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

आपण विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करीत असून येत्या आठ दिवसांत सर्व सुरळीत होईल, असे आश्वासन कनिष्ठ अभियंता बोधनकर यांनी दिले. या वेळी चौक उपसरपंच सुभाष पवार, ओसवाल यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



## माणगावमध्ये पंतप्रधान मोदींच्या बॅनरवर पुष्पवृष्टी

**माणगाव : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली. माणगाव शहरातदेखील भाजप कार्यकर्त्यांकडून भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जल्लोष करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा बॅनर लावण्यात आला होता. या बॅनरवर पुष्पवृष्टी व दुग्धभिषेक करण्यात आला.



या वेळी सोशल मीडिया रायगड जिल्हा संयोजक सुशीलकुमार शर्मा, तालुकाध्यक्ष उमेश साटम, ज्येष्ठ नेते सुरेंद्र साळी, महिला मोर्चा शहराध्यक्ष भारती शेठ, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष परेश सांगळे, चिटणीस तृप्ती कोठारी, बाबुराव चव्हाण, अनिल दांडेकर, केतन अडीत, अरुण पेणकर, अमोल पवार, राजेंद्र गाडे, राजेंद्र तेटगुरे, योगेश पालकर, सुरेंद्र साळी, मंदार मढवी, आकाश मढवी, निखिल साळुंखे, ओमकार गायकवाड व भाजप विविध सेल व प्रकोष्ठचे पदाधिकारी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हा युवा मोर्चाध्यक्ष निलेश थोरे म्हणाले की, १० वर्षे सतत नरेंद्र मोदी साहेबांनी देशाची सेवा करीत प्रत्येक घटकाला न्याय देत देशाला प्रगतीपथावर आणले आहे. यामुळेच देशाने या प्रधानसेवकाला पुन्हा सेवेची संधी दिली आहे. यामुळे आम्ही कार्यकर्ते हा आनंद जल्लोष साजरा करीत आहोत.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे.

सोमवारी (दि.१०) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २५० वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ८२ हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे.

## केंद्र सरकारच्या स्थापनेचा वाशी गावात आनंदोत्सव

**धाटाव : प्रतिनिधी**

नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. पुन्हा एकदा एनडीए सरकार सत्तेत आले आहे. त्यामुळे भाजप आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. ठिकठिकाणी जल्लोष साजरा केला जात आहे तसाच आनंद रोह्यातील वाशी गावात फटाक्यांची आतषबाजी फटाके फोडून करण्यात दिवाळी साजरी करण्यात आली.

भाजप रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे यांनी गावातील नागरिकांना पेंढा भरून मोदीजी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. या वेळी भाजपचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



# द. आफ्रिकेची बांगलादेशवर संघर्षपूर्ण मात

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकपमध्ये दक्षिण आफ्रिकेने बांगलादेश अवघ्या चार धावांनी विजय मिळवत सुस्कारा टाकला. न्यूयॉर्कच्या आव्हानात्मक खेळपट्टीवर दक्षिण आफ्रिकेला ११३ धावाच करता आल्या. बांगलादेशचा संघ विजयपथावर होता, मात्र हाणामारीच्या षटकात बांगलादेशला विजय गवसला नाही.

काही दिवसांपूर्वीच अमेरिकेने पाकिस्तानला नमवले होते, तर अफगाणिस्तानने न्यूझीलंडला हरवले होते. या यादीत आता आफ्रिकेची भर पडण्याची शक्यता होती. टी-२० वर्ल्डकपच्या इतिहासात आफ्रिका आणि बांगलादेश यांच्यात तीन लढती झाल्या होत्या. तिन्हीमध्ये दक्षिण आफ्रिकेनेच बाजी मारली होती. तो इतिहास कायम राहिला. रविवारी याच खेळपट्टीवर भारत आणि पाकिस्तान सामना झाला होता. भारतीय संघाने ११९ धावांचा यशस्वी बचाव केला होता. गोलंदाजांना पोषक अशा खेळपट्टीवर प्रथम फलंदाजी करणे



अतिशय कठीण मानले जात आहे.

स्पर्धेत या मैदानावर झालेल्या लढतींचा इतिहास माहिती असूनही दक्षिण आफ्रिकेने फलंदाजी स्वीकारली. पहिल्याच षटकात तान्झिम सकीबने रीझा हेन्ड्रिक्सला माघारी धाडले. तो भोपळाही फोडू शकला नाही. तिसऱ्या षटकात तान्झिमनेच क्विंटनला त्रिफळाचीत केले. पुढच्या षटकात तास्किन अहमदने आफ्रिकेचा कर्णधार एडन मारक्रमला तंबूचा रस्ता दाखवला. पाठोपाठ युवा ट्रिस्टन स्टब्सही भोपळाही न फोडता पॅव्हेलियनमध्ये परतला. दक्षिण आफ्रिकेची स्थिती चार बाद २३ अशी झाली. यानंतर डेव्हिड मिलर आणि हेनरिच क्लासन यांनी पाचव्या विकेटसाठी ७९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. या दोघांनी एकेरी-दुहेरी धावांचा रतीब घालतानाच चौकार-षटकारही लगावले. या भागीदारीमुळेच आफ्रिकेला सन्मानजनक धावसंख्या गाठता आली. तास्किनने क्लासनला बाद करीत ही जोडी फोडली. त्याने ४६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. पुढच्याच षटकात डेव्हिड मिलर रिषाद हुसेनच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याने २९ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेला ११३ धावांचीच मजल मारता आली. बांगलादेशकडून तान्झिमने तीन, तर तास्किनने दोन विकेट्स घेतल्या.

या छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना तांझिड हसनने दोन चौकारांसह आक्रमक सुरुवात केली, पण कागिसो रबाडाने त्याला बाद केले. कर्णधार शंटो आणि लिट्टन दास डाव सावरला. केशव महाराजने लिट्टनला मिलरकडे झेल देण्यास भाग पाडले. अनुभवी शकीब अल हसनकडून बांगलादेशला मोठ्या अपेक्षा होत्या, पण अवघ्या तीन धावा करून शकीब माघारी परतला. ॲनरिक नॉर्कियाने त्याला बाद केले. नॉर्कियानेच शंटोलाही बाद केले. यानंतर महमदुल्ला आणि तौहिद हृदॉय यांनी पाचव्या विकेटसाठी ४४ धावांची भागीदारी केली. तौहिदला रबाडाने पायचीत केले. त्याने ३७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. जेकर अली आठ धावा करून तंबूत परतला. महमदुल्ला हा बांगलादेशचा आशास्थान होता.

अंतिम षटकात बांगलादेशला ११ धावांची आवश्यकता होती. केशव महाराजचा पहिला चेंडू वाईड ठरला. पुढच्या चेंडूवर महमदुल्लाने एक धाव काढली. जेकर अलीला बाद करीत महाराजने आफ्रिकेला पुनरागमनाची संधी दिली. चौथ्या चेंडूवर लेगबायची एक धाव मिळाली. पाचव्या चेंडूवर फुलटॉसवर महमदुल्लाने जोरदार फटका लगावला, पण एडन मारक्रमने सीमीरेषजवळ काटेकोरपणे झेल टिपत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. अंतिम चेंडूवर बांगलादेशला सहा धावांची आवश्यकता होती, पण तास्किन केवळ एकच धाव मिळवू शकला. दक्षिण आफ्रिकेकडून महाराजने तीन, तर रबाडा आणि नॉर्किया यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

## नियमाने केला बांगलादेशचा घात

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

अतिशय तांत्रिक वाटणाऱ्या नियमाचा फटका बांगलादेश संघाला बसला. टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत बांगलादेशचा संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध विजयाच्या उंबरठ्यावर होता, मात्र दक्षिण आफ्रिकेने टिच्चून खेळ करीत अवघ्या चार धावांनी बाजी मारली. या पराभवाचे शल्य बांगलादेशला प्रदीर्घ काळ टोचत राहील, कारण एका तांत्रिक नियमामुळे त्यांना चार धावा मिळाल्या नाहीत आणि तेवढ्याच फरकाने त्यांचा पराभव झाला.

१६व्या षटकानंतर बांगलादेशला २४ चेंडूंत २७ धावांची आवश्यकता होती. पहिल्या चेंडूवर तौहिद हृदॉयने एक धाव घेतली. दुसऱ्या चेंडूवर जे घडले त्याने बांगलादेशच्या स्वप्नांवर पाणी फेरले गेले. ओटेनिल बार्टमनने टाकलेला दुसरा चेंडू महमदुल्लाने तटवून काढला. लेगस्टंपच्या दिशेने पडलेला हा चेंडू वेगाने सीमारेषेपल्याड गेला. महमदुल्लाने अक्रॉस जाऊन फ्लिक करण्याचा



प्रयत्न केला होता. चेंडू पॅडला लागून वेगाने बाऊंड्रीच्या दिशेने गेला. दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंनी अपील केले. ऑस्ट्रेलियाचे पंच सॅम नोगाज्सकी यांनी आफ्रिकेच्या बाजूने कौल देत बादचा निर्णय दिला.

महमदुल्लाने त्वरित रिव्ह्यू घेतला. रिप्लेत चेंडू लेगस्टंपच्या बाहेर जात असल्याचे स्पष्ट झाले. पंचांनी त्यांचा निर्णय बदलला. महमदुल्लाला जीवदान मिळाले, पण धावा मिळाल्या नाहीत. चेंडू पॅडला लागून सीमारेषेपल्याड गेला खरा, पण पंचांनी बादचा निर्णय दिल्याने चेंडू डेड झाला. त्यामुळे बांगलादेशला लेगबाईजच्या चार धावा मिळू शकल्या नाहीत. या चार धावाच बांगलादेशच्या पराभवाचे कारण ठरल्या अशा भावना बांगलादेशच्या चाहत्यांनी व्यक्त केल्या.

## आफ्रिकेने मोडला भारताचा विक्रम



**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० वर्ल्डकपमध्ये आता चुरशीच्या लढाया सुरू झाल्या असून दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेश यांच्यातही अटीतटीचा सामना रंगला. द. आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेत केवळ ११३ धावांचे लक्ष्य बांगलादेशला दिले आणि या छोट्या धावसंख्येचा बचाव करून भारताचा विक्रम मोडला.

भारतविरुद्ध सामन्यात भारताने पाकिस्तानला १२० धावांचे लक्ष्य दिले आणि पाकिस्तानला या लक्ष्यापर्यंत पोहचूही नाही दिले. भारताने टी-२० विश्वचषक स्पर्धेत सर्वांत लहान धावसंख्या डिफेन्ड करण्याचा रेकॉर्ड रचला, पण दक्षिण आफ्रिकेने हा रेकॉर्ड केवळ २४ तासांतच मोडीस काढला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेने बांगलादेशविरुद्ध ६ बाद ११३ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ सर्वतोपरी प्रयत्न करूनही सात विकेट्सवर १०९ धावाच करू शकला. आफ्रिका संघाने हा सामना चार धावांनी जिंकला आणि टी-२० वर्ल्डकपमध्ये नवा रेकॉर्ड रचला. यासह आफ्रिकेने भारत आणि श्रीलंकेला या रेकॉर्डमधून मागे टाकले.

## डीआरएस नियमावर वसीम जाफरने ठेवले बोट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकातील सामन्यात बांगलादेश संघाला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभव पत्करावा लागला. न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या रोमहर्षक लढतीत आफ्रिकन संघाने त्यांचा चार धावांनी पराभव केला. आता हा सामना पंचांच्या चुका आणि वादग्रस्त डीआरएस नियमामुळे वादात सापडला. त्यामुळे बांगलादेश संघ अधिकच निराश झाला आहे, कारण पंचांच्या वादग्रस्त निर्णयामुळे त्यांना सामना गमवावा लागला. ज्यावर आता वसीम जाफर याने प्रतिक्रिया दिली आहे.

बांगलादेशला विजयासाठी २४ चेंडूंत २७ धावा करायच्या होत्या. त्यांच्या



हातात सहा विकेट्स शिल्लक होत्या. भक्कम स्थितीत असलेल्या बांगलादेशी संघाला येथून सामना गमवावा लागला. १७व्या षटकात दक्षिण आफ्रिकेचा गोलंदाज ओटनील बार्टमन गोलंदाजी करायला आला, तेव्हा महमुदुल्लाह आणि तौहीद हृदया क्रीजवर होते. बार्टमनच्या दुसऱ्या चेंडूवर महमुदुल्लाहचा फ्लिक शॉट चुकला. चेंडू त्याच्या पॅडला लागला आणि सीमारेषेबाहेर गेला, मात्र पंच सॅम नोगाज्स्कीने महमुदुल्लाहला एलबीडब्ल्यू आऊट घोषित केले. बांगलादेशी फलंदाजाने रिव्ह्यू घेतला आणि बॉल ट्रॅकिंगवरून असे दिसून आले की चेंडू लेग स्टंपच्या बाहेर जात आहे, तरीदेखील पंचांनी महमुदुल्लाहला आऊट घोषित केले.

भारताचा माजी फलंदाज वसीम जाफरने सोशल मीडियावर सांगितले की, महमुदुल्लाला चुकीच्या पद्धतीने एलबीडब्ल्यू आऊट घोषित करण्यात आले, चेंडू लेगबायने चार धावांसाठी सीमारेषेच्या बाहेर गेला. यानंतर डीआरएसमध्ये निर्णय उलटला, पण बांगलादेशला चार धावा मिळाल्या नाहीत, कारण एकदा फलंदाजाला बाद केल्यानंतर चेंडू डेड झाला. भले ते चुकीच्या पद्धतीने झाले असेल. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने अवघ्या चार धावांनी सामना जिंकला. त्यामुळे मला बांगलादेशच्या चाहत्यांसाठी वाईट वाटले.

सामन्यादरम्यान समालोचक आणि माजी खेळाडू अंबाती रायुडू यांनी हे अतिशय खराब पंचगिरी असल्याचे म्हटले आहे. 'चेंडू कोणत्याही स्थितीत स्टंप्सचा वेध घेणे शक्य नव्हते. बाद देण्याचा निर्णय अगम्य होता. या निर्णयामुळे बांगलादेशला हक्काच्या चार धावा लेगबाईजच्या रूपात मिळू शकल्या नाहीत', असे रायुडू यांनी म्हटले.

## हरभजनने खडसावल्यानंतर अकमलने वादग्रस्त वक्तव्यासाठी मागितली माफी

**मुंबई : प्रतिनिधी**

अलीकडेच पाकिस्तानी क्रिकेटर कामरान अकमलने अर्शदीप सिंगबद्दल वांशिक टिप्पणी केली होती. यानंतर अनुभवी भारताचा माजी ऑफस्पिनर हरभजन सिंगने संतप्त प्रतिक्रिया देताना अकमलला खडसावले. आता अकमलने सोशल मीडियावर एक पोस्ट लिहून हरभजन सिंग आणि संपूर्ण शीख समुदायाची माफी मागितली आहे.



९ जून रोजी झालेल्या भारत-पाकिस्तान टी-२० विश्वचषक सामन्यादरम्यान कामरान अकमलने अर्शदीप आणि त्याच्या धर्माबद्दल असभ्य टिप्पणी केली होती. एआरवाय वाहिनीवर बोलताना कामराननने अर्शदीपसंदर्भात केलेले वक्तव्य वादग्रस्त ठरले. अर्शदीपने भारतीय डावातील शेवटचे षटक टाकले, ज्यात त्याने १८ धावांचा बचाव केला. यावर भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंगने रिपोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये अकमल म्हणत आहे की, काहीही होऊ शकते. १२ वाजले आहेत. असे बोलून तो जोरजोरात हसायला लागतो.


अर्शदीप सिंगवर कमेंट केल्याने कामरान अकमलला हरभजन सिंगच्या रोषाला सामोरे जावे लागले. भज्जीने लिहिले की, कामरान अकमल तुझा धिक्कार आहे. तुझे घाणेरडे तोंड उघडण्यापूर्वी शिखांचा इतिहास जाणून घ्यायला हवा. आम्ही शीखांनी तुमच्या माता-भगिनींना वाचवले होते, जेव्हा त्यांना आक्रमणकर्त्यांनी पळवून नेल्या होत्या, वेळ रात्रीचे १२ वाजले होते. त्यामुळे तुम्हा लोकांना लाज वाटली पाहिजे. कामरान अकमल तुम्ही याबद्दल खरेतर आभार मानायला हवे.

यानंतर आता अकमलने त्याच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये त्याने माफी मागितली आणि लिहिले, माझ्या अलीकडील टिप्पण्यांबद्दल मला मनापासून खेद वाटतो. हरभजन सिंग आणि शीख समुदायाची मनापासून माफी मागतो. माझे शब्द अयोग्य आणि अपमानास्पद होते. मला जगभरातील शीख लोकांबद्दल खूप आदर आहे आणि माझा कधीही कोणालाही दुखावण्याचा हेतू नव्हता. मला खरच माफ करा.

पाकिस्तानला सामना जिंकण्यासाठी शेवटच्या षटकात १८ धावांची गरज होती, परंतु अर्शदीप सिंगने शानदार गोलंदाजी करीत या धावांचा बचाव केला आणि टी-२० विश्वचषकात भारताने पाकिस्तानला सातव्यांदा पराभूत केले.

## आता लक्ष्य विम्बल्डन -अल्कराझ


**पॅरिस : वृत्तसंस्था**



स्पेनच्या कार्लोस अल्कराझने आता विम्बल्डन विजेतेपद राखण्याचे लक्ष्य असून ते पुढील आव्हान असल्याचे म्हटले आहे. फ्रेंच विजेतेपद जिंकल्यानंतर क्ले कोर्ट (लाल माती), ग्रास कोर्ट आणि हार्ड कोर्टवर विजेतेपद मिळवणारा अल्कराझ सर्वांत तरुण खेळाडू ठरला आहे.

वयाच्या २१व्या वर्षीच तीन ग्रँडस्लॅम विजेतेपदे जिंकणारा अल्कराझ म्हणाला की, ज्या पृष्ठभागावर स्पर्धा असेल, त्याचा सराव मी करतो. क्ले कोर्टवर खेळायला शिकलो असलो, तरी मला हार्ड कोर्ट अधिक आवडते. नोव्हाक जोकोविचवर सातवेळा विजय मिळवल्याने ग्रास कोर्टवरील यशही मला खुणावते. विम्बल्डन विजेतेपद राखणे हे माझ्यासमोरील तातडीचे उद्दिष्ट असेल. 'ग्रँडस्लॅम जिंकणे सोपे नाही. मैदानातील सरावाबरोबर तुम्हाला खेळाचा अभ्यास करता यायला हवा आणि तुमची मानसिकता खंबीर असायला हवी, असे अल्कराझने सांगितले.

अल्कराझ मोठी स्पर्धा जिंकला की त्या विजेतेपदाची तारीख तो आपल्या शरीरावर गोंदवून घेतो. आता अल्कराझला ऑस्ट्रेलियन विजेतेपद खुणावत आहे.




## धोनीची कुटुंबाबरोबर पॅरिसमध्ये सफर; फोटो व्हायरल



**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी सध्या कुटुंबाबरोबर पॅरिसमध्ये सफरनामा करत आहे. धोनीची पत्नी साक्षी आणि लेक झिवाने सोशल मीडियावर पॅरिसमधील काही फोटो शेअर केले आहेत.

पॅरिसमधील सुप्रसिद्ध आयफेल टॉवरसमोर धोनी कुटुंबाने खास फोटोशूट केले. फ्रान्सची राजधानी असलेल्या पॅरिसमध्ये आयफेल टॉवर आहे. या फोटोंमध्ये साक्षीने पिवळ्या रंगाचा फ्लोरल प्रिंट ड्रेस परिधान केला आहे. झिवानेही फोटोसेशन केले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com